। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक २८ वा । बुधवार दिनांक ०१ एप्रिल, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, रामेश्वर लहु मोरे, वय २५ वर्षे, रा. टाकळी बें पोस्ट कनगरा ता. जि. धाराशिव यांनी दि ३०.०३.२०२६ रोजी आपल्या राहते घरी टाकळी बें पोस्ट कनगरा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ सुगंधीत तंबाखु व डायरेक्टर पान मसाला असे कुण ३९,९३० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन म.राज्य धाराशिव यांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द ढोकी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### ॲल्युमिनीयम तारेची चोरी : गुन्हा दाखल

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.२१.०२.२०२६ टाटा कंपनीचे धानुरी शिवारा शेत गट नं ६२२,६२३ खेड शिवारा शेत गट नं ४१, लोहारा खुर्द गट नं १०४,१०५ व फणेपुर शिवार गट नं ३६८,३६९ मधील विद्युत पोलीवरील ५३४० मिटर लांबीचीशले panther ॲल्युमिनीयम तार ही अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संतोष बाळकृष्ण निकम, वय ४५ वर्षे, साइड इंचार्ज सुयोग उर्जा जि. मुंबई रा. शर्मदा गार्डन प्लॉट नं ६ व्यंकटपुरा पेठ सातारा ता. जि. सातारा ह.मु. दाळींब ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत पीडितांना न्याय व आधार देणे हीच प्रशासनाची प्राथमिकता- जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

## ॲट्रॉसिटी प्रकरणातील वारसांना शासकीय नियुक्ती आदेश: आंतरराष्ट्रीय नेमबाज चेतन सपकाळचा गौरव

धाराशिव दि.३१ मार्च (जिमाका) अनुसूचित जाती व जमातीच्या प्रवर्गाच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा (ट्रॉसिटी कायदा) अत्यंत महत्त्वपूर्ण असून जातीय अन्याय निर्मूलनाच्या दिशेने टाकलेले हे प्रभावी पाऊल आहे. दर महिन्याला जिल्हा दक्षता समितीच्या नियमित बैठका घेऊन बाधितांना आर्थिक व न्यायालयीन मदत करण्यात येते. त्यामुळे या कायद्यांतर्गत अत्याचार पीडितांना तातडीने मदतीसाठी आपण प्रयत्नशील आहोत,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

आज (दि.३१ मार्च) जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय धाराशिव यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ट्रॉसिटी प्रकरणांतील मृतांच्या कुटुंबीयांना शासकीय/निमशासकीय सेवेत नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. याच कार्यक्रमात धाराशिवचा आंतरराष्ट्रीय दिव्यांग नेमबाज चेतन सपकाळ याचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी पुजार होते.यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदळकर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, राजाभाऊ ओहोळ, विद्यानंद बनसोडे,महादेव वाघमारे व समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुजार पुढे म्हणाले की,चेतन सपकाळ हा जिल्ह्याचा अभिमान असून त्याने आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवून जिल्ह्याचा मान उंचावला आहे. अनेक खेळाडूंना तो प्रेरणादायी ठरत असून त्याच्या आदर्शातून इतरांनीही प्रगतीची दिशा घ्यावी.तसेच ट्रॉसिटी कायद्याबाबत जनजागृती सुरू असून नियुक्ती आदेश मिळालेल्या वारसांनी शासकीय सेवेत प्रामाणिकपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

श्रीमती.प्रियंवदा महाडदळकर म्हणाल्या की,अशा उपक्रमांमुळे सामाजिक विकासाला गती मिळत आहे.अत्याचार पीडितांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेणे ही महत्त्वाची बाब आहे.चेतन सपकाळच्या यशामागे त्याच्या आईचे योगदान मोठे असून त्या खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहेत.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते चेतन सपकाळ याचा त्याच्या आई - वडिलांसह भारतीय संविधान उद्देशिकेची प्रत,प्रशस्तीपत्र व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच नियुक्ती आदेश प्राप्त उमेदवारांनाही भारतीय संविधान उद्देशिकेची प्रत, नियुक्ती आदेश व पुष्प देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले,संचालन समाज कल्याण निरीक्षक अतुल जगताप यांनी केले.उपस्थितांचे आभार समाज कल्याण अधिकारी सनम लामकाने यांनी मानले. कार्यक्रमाला नियुक्ती आदेश मिळालेल्या उमेदवारांसह त्यांच्या नातेवाईकांची व समाज कल्याण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२० नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित २०१५)अंतर्गत खून अथवा अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील पात्र वारसांना शासकीय किंवा निमशासकीय नोकरी देण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय राबविण्यात येत आहे.या अनुषंगाने जिल्ह्यातील एकूण २६ प्रकरणांचा समावेश करण्यात आला असून त्यापैकी २० प्रकरणे अनुसूचित जाती तर ६ प्रकरणे अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत.




सन २०१२ पासून प्रलंबित असलेल्या या प्रकरणांपैकी जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या १८ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत १५ प्रकरणे (अनुसूचित जाती १२ व अनुसूचित जमाती ३) मंजुरीसाठी सादर करण्यात आली होती.या प्रस्तावांपैकी अनुसूचित जातीच्या १२ प्रकरणांना समाज कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी नियुक्तीसाठी मंजुरी दिली आहे.त्यामधील ३ प्रकरणांमध्ये वारसांवर गुन्हे दाखल असल्याने प्रक्रिया प्रलंबित आहे,तर एका प्रकरणात बीड येथील समाज कल्याण विभागाच्या वसतिगृहात नियुक्ती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.उर्वरित ७ पात्र वारसांना नियुक्ती आदेश वितरीत करण्यात आले.

दरम्यान,काही प्रकरणे विविध कारणांमुळे प्रलंबित आहे.२ प्रकरणे प्रतीक्षासूचीत,६ प्रकरणांत शेतजमिनीची मागणी,१ अनुकंपा तत्वावरील नियुक्ती,१ प्रकरणात कायदेशीर वारस प्रमाणपत्राचा अभाव आणि १ प्रकरणात आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ (सुधारित अधिनियम २०१५) अंतर्गत पात्र वारसांना देण्यात आलेल्या नियुक्त्यांमध्ये श्री.महादेव संदिपान वाघमारे (मु.पो. पारा,ता.वाशी) यांची जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव येथे शिपाई (गट-ड) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.तसेच श्री.अक्षय गौतम गंगावणे (सिद्धार्थनगर,सांजा रोड,धाराशिव) यांची जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, धाराशिव येथे शिपाई (गट-ड) पदावर नियुक्ती झाली आहे. श्री.अक्षय सहदेव मस्के (जवळगा (मेसाई), ता.तुळजापूर) यांची अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, मुरूम (ता. उमरगा) येथे शिपाई (गट-ड) पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.याचप्रमाणे श्रीमती दिपाली चंद्रकांत गायकवाड/दिपाली जयकुमार शेलार (कासारवाडी,पुणे) यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,परंडा येथे शिपाई (गट-ड) पदावर नियुक्ती झाली आहे.श्री.समाधान सहदेव कठारे (सारोळा बु.,ता.धाराशिव) यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,कळंब येथे पहारेकरी (गट -ड) पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.तसेच श्रीमती पूजा शहाजी मस्के(व्हनाळा,ता. तुळजापूर) यांची मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह,तुळजापूर येथे सफाईगार (गट-ड) पदावर नियुक्ती झाली असून श्री.रुकेश बाळासाहेब सरवदे(भिकारसारोळा,ता.धाराशिव) यांची मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह,उमरगा येथे पहारेकरी (गट-ड) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण वरिष्ठ निरीक्षक राहून काटकर,कपिल थोरात,अमोल काटांगळे,कार्यालय अधीक्षक श्रीमती. सुरेखा गवळी व बिभीषण शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

## १३५ व्या भीमजयंतीनिमित्त कळंब आगारात महिला नेतृत्वाला मान - जयंती उत्सवाची धुरा महिला कर्मचाऱ्यांच्या हाती



कळंब (प्रतिनिधी)- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाच्या नियोजनासाठी कळंब आगारात उत्साहपूर्ण बैठक पार पडली असून, यंदाच्या जयंती उत्सवाची धुरा महिला कर्मचाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आल्याने आगारात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दि. ३० मार्च २०२६ रोजी दत्त मंदिर, रा. प. कळंब आगार येथे आयोजित बैठकीत आगारातील महिला व पुरुष कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. बैठकीत जयंती उत्सवाचे नियोजन, जबाबदाऱ्या आणि विविध समित्यांची रचना यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाची प्रस्तावना रविकांत शिंदे यांनी मांडली. त्यानंतर सर्वानुमते जयंती उत्सव समितीची निवड करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी सौ. राजकन्या गवळी (निंबाळकर) यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी श्रीमती वंदना पालके, सचिवपदी सौ. संध्या सोनटक्के, कोषाध्यक्षपदी सौ. सरोजा औसेकर व सौ. निवेदिता रणदिवे, तर प्रसिद्धी प्रमुखपदी सौ. प्रियंका शिंदे व सौ. अनुराधा भोसले यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली.

महिला कर्मचाऱ्यांना नेतृत्वाची संधी देत जयंती उत्सवाची सूत्रे त्यांच्या हाती देण्यात आल्याने आगारातील कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. आगामी भीमजयंती उत्सव अधिक उत्साहात, शिस्तबद्ध आणि सामाजिक संदेश देणारा व्हावा, असा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रकाश पटेकर, नितीन गायकवाड, प्रशांत गायकवाड, अंकुश गायकवाड, संघरक्षित गायकवाड, बिभीषण क्षीरसागर, विलास थोरात, अशोक रणदिवे, विश्वनाथ गव्हाळे, आर. वाय. नकाते, एस. एस. कानडे, एस. आर. जाधव, सुनील जगताप, सुबोध रणदिवे, श्याम बनसोडे, एस. बी. पठाण, डी. सी. सरवदे आदी कर्मचारी उपस्थित होते.

महिला नेतृत्वामुळे यंदाची भीमजयंती अधिक वेगळ्या स्वरूपात साजरी होणार असल्याची चर्चा आगार परिसरात रंगली आहे.

## ८.२९ लाखांच्या विक्रीसह नवतेजस्विनी महोत्सव २०२६ ची यशस्वी सांगता

धाराशिव (जिमाका)- महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) च्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत २७ ते २९ मार्च २०२६ दरम्यान धाराशिव क्लब मैदान,शहर पोलीस स्टेशनजवळ,धाराशिव येथे आयोजित नवतेजस्विनी महोत्सव २०२६ चा उत्साहात समारोप आज झाला.या महोत्सवाचे उद्घाटन २७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी श्री.कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले.

या जिल्हास्तरीय प्रदर्शनात धाराशिव जिल्ह्यातील स्वयंसहाय्य महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंचे एकूण ४२ स्टॉल्स उभारण्यात आले होते.यामध्ये ज्यूस,उसाचा रस,लिंबू सरबत, गावरान तूप,अंडी,वर्मी कंपोस्ट खत, धान्य,कडधान्य,राजमा,कडक भाकरी,शेंगांची चटणी,दुग्धजन्य पदार्थ,मसाले,पापड,कुरडई,शेवया, मनुके,हस्तकला व शोभेच्या वस्तू, मूर्ती,फ्लॉवर पॉट,रेडीमेड कपडे तसेच विविध खाद्यपदार्थांचा



समावेश होता.या तिन्ही दिवसांत स्टॉलधारकांची एकूण सुमारे ८ लाख २९ हजार रुपयांची विक्री झाली असून महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवाच्या समारोप प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. विद्याचरण कडवकर,सहायक पोलीस निरीक्षक श्री.दिनेश जाधव, संरक्षण अधिकारी श्री.भुजंग भोसले, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री.सुखदेव चिंचोलीकर,तालुका स्तरीय सी.एम. आर.सी.अध्यक्षा श्रीमती.निर्मला उबाळे,श्रीमती.स्मिता पाटील,श्रीमती. सुरेखा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रदर्शनात सहभागी सर्व स्टॉलधारकांचा मान्यवरांच्या हस्ते नवतेजस्विनी महोत्सव २०२६ सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

हा महोत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी माविम जिल्हा कार्यालय तसेच तालुका स्तरीय सी.एम.आर.सी.यांनी विशेष प्रयत्न केले.

धाराशिवकरांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी श्री. सुखदेव चिंचोलीकर यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले.

## प्राण्यांना ठार मारण्याचे उद्देशाने खाद्यामध्ये विषारी औषध मिसळणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विजय उमराव शेलार, वय ४१ वर्षे, रा. होनाळा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे बारुळ शिवारातील शेत गट नं १६/२ मध्ये अज्ञात व्यक्तीने खोडसाळपणे नुकसान व प्राण्यांना ठार मारण्याचे उद्देशाने शेडमधील नेचर डिलाईट कंपनीचे मका भरडा व सुगरास पोत्यामधील खाद्यामध्ये कोणते तरी विषारी औषध मिसळले असुन ते खाद्य दुध देणाऱ्या सात गाईना खाण्यास दिले असता सदर सात गाईना विषबाधा होवून त्यामधील तिन गाई मयत झाल्या. उर्वरीत गाई या पशु वैद्यकीय अधिकारी यांचे करवी उपचार घेत आहेत. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-विजय शेलार यांनी दि.३०.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम ३२५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिवातून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी -पांडुरंग कल्याणराव देशमुख, रा. विद्यानगर तांबरी विभाग धाराशिव यांची अंदाजे १५,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.२५.०३.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील दिप हॉटेल जवळ धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- पांडुरंग देशमुख यांनी दि.२६.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## जनतेला आडाणी ठेवणे पडते महागात..

देश म्हणजे काय तर देशातील जनता, ती जनता हुशार व राष्ट्राभिमानी असली पाहिजे. देश म्हणजे दगड-धोंडे नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. देशातील निरोगी जनता हीच देशाची खरी संपत्ती आहे. देशात ज्या काही वाईट बाबी घडतात याला जबाबदार आडणी जनता आहे. जनतेला शहाणे करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. आपला गौरवशाली इतिहास शिकविणे हे सरकारचे काम आहे. आपल्या देशात अनेक महान व्यक्ती, शुर-पराक्रमी होवून गेले, त्यांचा इतिहास नवतरूणावर बिंबविण्याची गरज आहे. ते सोडून भारताला स्वराज्य मिळाले तरी मोगलाचा इतिहास शिकविला जातो. परदेशातील क्रांतीचा इतिहास शिकविला जातो. याची भारतीयांना काय गरज आहे. अकबर कसा होता. औरंगजेब कसा होता. शहाजान प्रेमपुजारी होता. आदि इतिहास सांगण्यासाठी हा पाकिस्तान नाही तर हिंदुस्थान आहे. महाराणाप्रताप कमी होते का? छत्रपती शिवाजी महाराज हे मोगला पेक्षा कमी होते का? त्याना कमी का लेखता! अन्याय अत्त्याचारी, महिलांचा वापर करणारी, शेकडो बायका असणाऱ्यांचा इतिहास का शिकविला जातो, त्यांचा उदो-उदो का केला जाते? हे कळून येत नाही. अनेक गावात पेहलवान झाले व घडविले. अशांना आंधारात ठेवले जाते. अनेक ग्रामीण भागात जे शास्त्राज्ञाला जमले नाही ते प्रयोग करतात त्यांना उजेडात का आणले जात नाही. नको तो चुकीचा इतिहास शिकवला जात असल्याचा परिणाम, भारतीय हे म्हणावे तेवढे राष्ट्राभिमानी बनत नाहीत, बनले नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचार वाढला, आपुलकी निर्माण होणे बंद झाले. अनेक मुली बेपत्ता झाल्या तरी गप्प राहीले जाते. हे कशासाठी? तर आपला गौरवशाली महान इतिहास अजून ही उजेडात आणाला गेला नाही. एक बाजूच समोर आणली जाते. एखाद्याला गोळ्या घातल्या? का घातल्या हे सांगितले जात नाही. बऱ्याच बाबी जतनेला कळू न देणे ही देशासाठी मोठी चुक ठरू शकते. त्यामुळे देशातील नागरिकांनी विचार करावा की, जे सत्तरवर्षात चालू आहे ते पुन्हा घडू नये. देश हा भारतीयांचा आहे. भारतीय मंडळी भेकड नाही. संताजी-धनाजी हे मावळे मोगलांचे घोडे पाणी पिताना पाण्यात दिसत होती.एवढी दहशत मावळ्याची होती. आता बँका लुटल्या तरी गप्प! पळून जातात. गैरकाम करणारे देशातून पळून गेले. त्यांच्यापासून काय वसुल केले. एखादा गोरगरीबांनी छोटे कर्ज काढले तर जप्ती केले जाते, त्याची बदनामी केली जाते. हा फरक कधी संपविणार? देशात सुरवातीपासून एक षडयंत्र निर्माण करण्यात आले असेल. सत्य काय ते कळू न देणे. देशातील स्वार्थी, लबाड व देश लुटणारी मंडळींनी प्रथम वेद हे भारतीयांचा ग्रंथ आहे तेच लपवुन ठेवले, राक्षसांनी पळविले असे सांगण्यात आले. महर्षि दयानंद सरस्वती यांनी जर्मनवरून वेद मागविले. ते देशातील जनतेला वाटले. खरी मनुस्मृती जाणून न घेता टिका होते. शुद्ध मनुस्मृती वाचली पाहिजे. महाभारत, असो रामायाण अशा ग्रंथात मिलावट केली, चुकीचे लिखाण केले गेले. श्लोक चुकीचे खुपसण्यात आले. देशाविरोधात मत व्हावे असे मिसळण्यात आले. योगीराज श्रीकृष्णाबाबत चुकीची माहिती जनतेसमोर मांडली जाते. चुकीची माहिती जाहिर रित्या सांगितली जाते. हनुमान हा वनात राहाणार संस्कृत ज्ञानी होते. त्याला माकड बनविले. वनात राहाणार म्हणून वनातील नर, माणूस तो बलशाली होता. हवेत उडण्याची शक्ती प्राप्त केली होती. अशा महान व्यक्तीला शेपटी दाखविली जाते. भारतीयांनी विचार न करता ठरविक मंडळींनी भारताविषयी खेळलेले एक षडयंत्र आहे. हे भारतीयांनी जाणून घेतले पाहिजे. एखाद्याच्या चारित्र्याची पुजा न करता चित्राची पुजा केली जाते. जो उपाशी आहे त्याला भोजन प्रसाद दिला जात नाही. जनावरे आहेत. गायी, कुत्रे आदि भुतदयावर अन्याय केला जातो. पशु-पक्षी आहेत त्यांना खायला दिले पाहिजे. ते तर मागत नाहीत. बोलत नाही म्हणून प्रत्येकांनी विचार करून गायीला घास, घराच्या छतावर पाणी व अन्नाची सोय पक्षासाठी केली पाहिजे. त्याच प्रमाणे जो खात नाही त्याला प्रसाद चढवुन काय उपयोग होणार आहे? या बाबीचा विचार केला पाहिजे. ईश्वराने सर्वाधिक बुद्धी मानवाला दिली आहे. तीचा नीट उपयोग केला पाहिजे. तीच उपयोग देशासाठी केला पाहिजे. वेळीच सावध झालो नाही तर संकट अटळ आहे. केवळ विचार केला पाहिजे की, आपणास दिलेले ज्ञान हे अपुरे का आहे? शौर्य व गौरवशाली इतिहास का शिकविला जात नाही. छत्रपती संभाजी राजांचा इतिहास जो अंतिम यातनाचा होता तो शिकविला जात नाही एवढे काय ज्यावेळी टीव्हीवर मालिका होती त्यावेळी सुद्धा छत्रपती संभाजी राजेचा अंतिम भाग दाखविण्याची हिंमत झाली नाही. आपण भारतात राहात नाही असे त्यावेळी वाटले, स्वराज्यासाठी नखे काढले, डोळे फोडले, तापलेली सळई शरिरात खुपसली अशा स्वराज्य रक्षकाचा इतिहास गौरवशाली नाही का? राजा पेक्षा मोगलाचा इतिहास मोठा आहे याचा आता जनतेनी विचार केला पाहिजे. योग्य, सत्य ज्ञान जनतेसमोर मांडले जात नाही. त्यामुळे देशात काय राज्यात चुकीच्या बाबी घडत आहेत. राष्ट्रीयप्रेमाचा अभ्यास शालेय अभ्यासक्रमात केलाच पाहिजे. भारतात केवळ हिंदुच राहातात असे नाहीत, अनेक जातीची मंडळी गुण्यागोविंदाने नांदतात. त्यांचा काहींच अक्षेप नाही. विष कालविणारे बोटावर मोजण्याईतके सर्वच ठिकाणी सापडतात. आता झाले ते सत्तर वर्षात झाले, यापुढे तरी भारताचा गौरवशाली इतिहास हा तरूणांना शिकविला पाहीजे. त्यांना माहिती करून दिली पाहिजे. जो पर्यंत शालेय अभ्यासक्रम पहिली पासून उच्च शिक्षणापर्यंत इतिहास उलगडला पाहिजे. क्रौर्याच्या माहितीची गरज नाही तर गौरवशाली, शौर्याचा इतिहासाची मोठी गरज आहे. तो जर सर्वत्र शालेय अभ्यासक्रमात दाखल केला तर नवेरक्त राष्ट्राभिमाने रक्ताभिषणाने खळवल्याशिवाय राहाणार नाही. देशात भोंदू तर होणारच नाही त्यापेक्षा भ्रष्टाचारी समाप्त होतील. पुन्हा देशात महापुरुष जन्माला येतील. शिवाजी महाराज, धर्मरक्षक संभाजी राजे, महाराणाप्रताप, गुरुगोविंदसिंह, भगतसिंह आदि महापुरूष जन्माला येतील. भारताचा गौरवशाली इतिहास हा पुन्हा मोठ्या प्रमाणात उलगडा पाहिजे.

# गोपीनाथ मुंडे यांचा विचार आणि वारसा पुढे घेवून जाणारे आम्ही आहोत- ना. राम शिंदे

### ना. राम शिंदे यांची आ. कराड यांच्या संवाद कार्यालयास सदिच्छा भेट



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे आणि राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते यांनी लातूर ग्रामीणचे आमदार रमेशआप्पा कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली असता त्यांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले.

लातूर येथील एका कार्यक्रमासाठी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे, राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य खा. रामराव वडकुते आणि माजी आमदार रमेश शेंडगे हे आले असता त्यांनी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या लातूर येथील अंबाजोगाई रोडवर असलेल्या संवाद या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली यावेळी दोन्ही मान्यवरांचा आ. कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले. ना. राम शिंदे आणि आ. रमेशअप्पा कराड यांच्यात विविध विषयावर चर्चा झाली.

सत्करप्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना ना. राम शिंदे म्हणाले की, रमेशआप्पा आणि मी अनेक वर्षापासून चांगले मित्र आहेत, लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा विचार आणि वारसा पुढे घेऊन जाणारे आहोत. ज्यावेळी मी विधानसभेत होतो त्यावेळी रमेशआप्पा विधान परिषदेचे सदस्य होते तर आता मी विधानपरिषदेत आहे तर आप्पा विधानसभेत आहेत अवघ्या ६२२ मतांमुळे मी विधानसभेत जाऊ शकलो नाही मात्र येत्या काळात निश्चितपणे सुधारणा करू असे त्यांनी बोलून दाखविले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, लातूर मनपाचे विरोधीपक्ष नेते देविदास काळे, जिप सदस्य महादेव साळुंखे, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, पंस उपसभापती शरद दरेकर, अनिल भिसे, दशरथ सरवदे, वैभव सापसोड, उद्धव काळे, सुकेश भंडारे, सतीश आंबेकर, विजय काळे, विष्णू गोरे, वसंत करमुडे, मनोज कराड, राजकिरण साठे, हनुमंत गव्हाणे, सुधाकर काळे, गोपाळ पडिले, आदिनाथ मुळे, विजय चव्हाण, रमाकांत फुलारी, चंद्रकांत कातळे, भागवत गीते, अच्युत कातळे, सुरेखा पुरी, अंजली काळे, हेमांगी येळे, ललिता कांबळे, सिद्धेश्वर मामडगे, रवींद्र पाटील, लक्ष्मण गव्हाणे, संजय सावंत, माणिक आलुरे, संजय विरुळे, राजेंद्र काळे, आत्माराम जाधव, उत्तम चव्हाण, अहमद शेख, देवराव मोहिते, संतोष चव्हाण, लहूराजे सव्वाशे, रमेश खाडप, व्यंकट रसाळ, नारायण राठोड, विठ्ठल कस्पटे, मारुती शिंदे, लक्ष्मण खलंग्रे, विठ्ठल डोंगरे, गणेश डुबते, राम पटणे, नानासाहेब कसपटे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रे दाम्पत्याचा 'एज्युकॉन पुरस्कारा'ने सन्मान




**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाडा विभागात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल 'नवभारत'च्यावतीने आयोजित शैक्षणिक सन्मान सोहळ्यात राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व अध्यक्षा के. ए. जायेभाये यांना मंगळवारी 'एज्युकॉन पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल ट्रीट इम्पोरियल या ठिकाणी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे व शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते केंद्रे दाम्पत्याला सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवभारत' वृत्त समुहाचे अध्यक्ष ए. श्रीनिवास, जनरल मॅनेजर कल्याण पांडे, लातूर आवृत्ती प्रमुख जयप्रकाश दगडे, महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, दयानंद शिक्षण संस्थेचे विशाल लाहोटी, अजिंक्य सोनवणे, प्रणव शहा, ॲड. जांबुवंतराव सोनकवडे, ॲड. कंचनमाला संगवे यांची उपस्थिती होती. या पुरस्काराबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे डीन डॉ. चंद्रकांत बावीसकर, वसंतराव पाटील, राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, समन्वयक राजेंद्र जायेभाये, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, डॉ. गणेश नागरगोजे, संस्थेच्या संचालक कविता केंद्रे, स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, करिश्मा केंद्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# समाजाच्या हितासाठी कार्यरत रहावे : पोलीस अधिक्षक अमोल तांबे





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पोलीस दलातील बिल्ला क्रमांक १ एक म्हणजे वारकरी पोलीस महाराज अशी खास ओळख असलेले वारकरी संप्रदायाचे गाढे अभ्यासक पोलीस उपनिरिक्षक श्री. अनिल रामर्लिग स्वामी महाराज हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल लातूर पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या सभागृहात पोलिस उपअधिक्षक श्री.दिलीप सागर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गौरवपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सहकुटूब सहपरिवार सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलीस कल्याण निधीचे पोलीस निरिक्षक चव्हाण यांची प्रमूख उपस्थिती होती. तसेच यावेळी दहशतवाद विरोधी पथकातील पोलिस उपनिरिक्षक अयूब महेबूब शेख आणि पोलीस हवालदार विजयकुमार मल्लेश यांचाही सेवानिवृत्ती बद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात बोलताना पोलीस उपअधिक्षक दिलीप सागर म्हणाले की, सेवानिवृत्ती हा नागरी आयुष्यात सहभागी होण्यासाठीची मोठी उपलब्धी असते. पोलीस दलात कार्यरत असताना कडक अनुशासन आणि शिस्तीचे पालन करताना कुटुंबासाठी पुरेसा वेळ मिळत नसतो.

सेवानिवृत्ती नंतर आप आपल्या आवडीच्या क्षेत्रात कार्य करता येते. पोउपनि. अनिल स्वामी यांचे वारकरी संप्रदायातील कार्य आणि ज्ञानेश्वरी ग्रंथाचा अभ्यास दांडगा आहे. तसेच पोलीस सेवेत असताना त्यांनी बहुतांश ग्रामीण भागात सेवा बजावली आहे. आगामी वाटचालीसह त्यांना दीर्घायुष्य आणि दीर्घारोग्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना पोउपनि. अनिल स्वामी म्हणाले, मी १९९२ मध्ये पोलीस दलात रुजू झालो. गेल्या ३४ वर्षात मुरुड, किल्लारी, औसा, उदगीर, रेणापूर, चाकूर अशा ठिकाणी बहुतांश ग्रामीण भागातच सेवा बजावली आहे. आपल्या घरातील अध्यात्मीक संस्कार, ज्ञानेश्वरीचा अभ्यास आणि ग्रामीण भागातील वारकरी संप्रदायाचा पगडा पाहता पोलीस सेवेतील महाराज अशी ओळख निर्माण झाली. या ज्ञानामुळे गावातील तंटे - बखेडे गावकऱ्यांच्या मदतीने गावातच सोडविण्यासाठी पुढाकार घेता आला. पोलीस खात्यातील तत्वाशी प्रामाणीक राहून पोलीस आणि जनता यांच्यातील दुवा साधण्याचा प्रयत्न केला. आगामी काळात दक्षीणगंगा गोदावरी तीर्थक्षेत्र आणि वारकरी संप्रदायाचा विचार तरुण पिढीमध्ये रुजविण्याचे कार्य करण्याचा मानस त्यांनी व्यवत केला.

यावेळी लातूर मनपाचे माजी स्थायी सभापती तथा विद्यमान नगरसेवक भाजपा गटनेते ॲड मठपती, ज्येष्ठ पत्रकार पंकज जैस्वाल, व्हॉईस ऑफ मिडियाचे जिल्हाध्यक्ष काकासाहेब घुटे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी दक्षीणगंगा देवस्थान येथील ह.भ.प. मारुती महाराज कदम पाटील (रा.भायेगव ता.उमरी, जि.नांदेड), ह.भ.प. अशोक महाराज पाटील (रा.आंतरगाव ता.नायगाव जि.नांदेड), ह.भ.प. आसाराम महाराज घाटुळ (रा.मंगरूक ता.माजलगाव जिं. बीड), कोईम्बतूर येथील सीआरपीएफचे असिस्टंट कमांडन्ट सुमीत मस्के, आबासाहेब आगळे, अभिषेक मुदकन्ना, कृष्णा येडेकर आर्दीनीही पोलीस उपनिरिक्षक अनिल स्वामी यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन पोलीस कल्याण निधीचे श्री. अभंगे यांनी केले. यावेळी सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्माचाऱ्यांच्या कुटुंबियांसह नातेवाईक, मित्र, आप्तेष्टांची मोठी उपस्थिती होती.

**पोलीस अधिक्षकांकडून आस्थेवाईक स्वागत**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या साकार कार्यक्रमाला लातूरचे पोलीस अधिक्षक श्री. अमोल तांबे हे स्वतः आवर्जून उपस्थित राहतात. काटेकोर वेळ पाळतात. त्यांचे मागदर्शनही उपयुक्त ठरते. मात्र या प्रसंगी त्यांची वरिष्ठांसोबत तातडीची व्हीसी सुरु झाली होती. तरीही कार्यक्रमानंतर दस्तूरखुद्द पोलीस अधिक्षक श्री. अमोल तांबे यांनी सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या सोबत आलेत्या आप्तेष्टांचे आस्थेवाईक स्वागत करीत प्रत्यक्ष शुभेच्छा दिल्या. समाजाच्या हितासाठी कार्यरत रहावे. आपल्या ज्ञानाचा उपयोग उपेक्षीत घटकांसाठी द्यावा असे मार्गदर्शन त्यांनी केले. पोउपनि. अनिल स्वाभी यांना प्रत्यक्ष हस्तांदोलन करीत शुभेच्छा देत सर्वांसोबत छायाचित्र घेतले. पोलीस अधिक्षकांकडून आस्थेवाईक स्वागत झाल्यामुळेही वातवरणातील भावनिकतेचा गहिवर अधिक गडद झाला.

## मानसिक आरोग्यासाठी सर्वांगीन दृष्टिकोन: मन, शरीर आणि समाज यांचे एकत्रीकरण

मानसिक आरोग्य हा आधुनिक समाजातील एक अत्यंत महत्त्वाचा विषय असून, त्याकडे पारंपरिक पद्धतीने प्रामुख्याने वैद्यकीय आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले गेले आहे. तथापि, या दृष्टिकोनात व्यक्तीच्या जीवनातील इतर महत्त्वाच्या घटकांचा, जसे की सामाजिक, शारीरिक आणि आध्यात्मिक पैलूंचा, पुरेसा विचार केला जात नाही. त्यामुळे मानसिक आरोग्याच्या समस्यांचे प्रभावी आणि दीर्घकालीन निराकरण साध्य होत नाही.

सर्वांगीन दृष्टिकोन मानसिक आरोग्याला एक बहुआयामी संकल्पना म्हणून मानतो. या दृष्टिकोनानुसार मानसिक, शारीरिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय घटक एकमेकांशी परस्पर संलग्न असून, त्यांचा एकत्रित परिणाम व्यक्तीच्या एकूण कल्याणावर होतो. या लेखात समग्र मानसिक आरोग्याची संकल्पना सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आली असून, त्याचे मानसशास्त्रीय, वैद्यकीय, समाजशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानात्मक आधार तपासले आहेत.

याशिवाय, लेखात मानसिक आरोग्याच्या क्षेत्रातील कायदेशीर आणि धोरणात्मक पैलूंचा आढावा घेण्यात आला आहे. मानसिक आरोग्य हा एक मूलभूत मानवी अधिकार मानला जात असून, राज्य आणि संस्थांवर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आहे. तसेच, कार्यस्थळांवर मानसिक आरोग्य संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांचा विचार करण्यात आला आहे. लेखात तंत्रज्ञानाची भूमिका देखील स्पष्ट केली असून, डिजिटल साधनांमुळे मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ झाल्या आहेत, परंतु त्यावेळी अतिवापराचे दुष्परिणामही अधोरेखित केले आहेत.

अंशतः , समग्र मानसिक आरोग्य दृष्टिकोन स्वीकारण्यासाठी आवश्यक शिफारसी मांडण्यात आल्या आहेत. निष्कर्षतः, मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी एकात्मिक, प्रतिबंधात्मक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन अत्यावश्यक असून, तो केवळ वैयक्तिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीचा भाग आहे.

**– लेखिका: शारदा महारुद्र गुट्टे**

००००००००००००००

## भारतातील बाल शोषण: एक गंभीर सामाजिक आणि कायदेशीर

बाल शोषण ही केवळ कौटुंबिक समस्या नसून ती एक गंभीर मानवाधिकार समस्या आहे. भारताच्या लोकसंख्येत मुलांचा मोठा वाटा असूनही, त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही बिकट आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीनुसार, मुलांविरुद्धच्या गुन्ह्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे, जे समाजाच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

**शोषणाचे स्वरूप आणि व्याप्ती:**

भारतात बाल शोषण प्रामुख्याने शारीरिक, लैंगिक आणि भावनिक स्वरूपात आढळते. अभ्यासानुसार, ५०% पेक्षा जास्त मुलांनी त्यांच्या आयुष्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या शोषणाचा सामना केला आहे. विशेषतः घर आणि शाळा या सुरक्षित मानल्या जाणाऱ्या ठिकाणीच ५०% पेक्षा जास्त लैंगिक शोषणाच्या घटना घडतात, ज्यात ओळखीच्या व्यक्तींचा समावेश असतो. याशिवाय, बालमजुरी आणि बाल तस्करी ही शोषणाची आधुनिक रूपे गरिबीमुळे फोफावत आहेत.

**कारणीभूत घटक:**

**१. सामाजिक मानसिकता:** मुलांकडे मालमत्ता म्हणून पाहण्याची वृत्ती आणि शिस्तीच्या नावाखाली केली जाणारी मारहाण शोषणाला खतपाणी घालते.

**२. जागरूकतेचा अभाव:** पालक आणि मुलांमध्ये गुड टच-बॅड टच आणि कायदेशीर हक्कांबद्दल माहितीची कमतरता आहे.

**३. डिजिटल धोके:** इंटरनेटच्या युगात ऑनलाइन ग्रूमिंग आणि सायबर बुलिंग हे शोषणाचे नवीन मार्ग समोर आले आहेत.

**कायदेशीर संरक्षण आणि आव्हाने:**

भारत सरकारने कायदा (२०१२) आणि बाल न्याय अधिनियम (२०१५) यांसारखे कडक कायदे अमलात आणले आहेत. मात्र, अंमलबजावणीतील त्रुटी, न्यायालयांमधील प्रलंबित खटले आणि सामाजिक भीतीमुळे तक्रार नोंदवण्याचे कमी प्रमाण ही मोठी आव्हाने आहेत. शोषणाचा मुलांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम हा कायमस्वरूपी असतो, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात अडथळे येतात.

**निष्कर्ष:**

बाल शोषण रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. यासाठी शाळांमध्ये सुरक्षा शिक्षण अनिवार्य करणे, पालकांचे समुपदेशन आणि जलद गती न्यायालयांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित बालपण मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार असून, तो जपण्यासाठी समाज आणि शासन यांनी एकत्रित प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**– ॲड. मुंडे चंद्रकांत व्यंकटी**

००००००००००००००००००००००

## प्रा.शशिकांत देशमुख 'संगीत साधना' पुरस्काराने सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील आरोह संगीत अकादमीचे संचालक व धाराशिव येथील आर्य चाणक्य महाविद्यालयातील संगीत विभागप्रमुख प्रा. शशिकांत देशमुख यांना आंबेजोगाई येथील स्वर्गीय सौ. कुमुदिनी शंकरराव सोनवळर यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा ''संगीत साधना पुरस्कार''



ज्येष्ठ पखवाज वादक तालमणी उद्धवबापू आपेगावकर, दगडूजीदादा लोमटे व जेष्ठ तबलावादक उल्हास पांडे यांच्या हस्ते रोख रक्कम व मानपत्र देऊन सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. आंबेजोगाई येथील ''संगीत साधना मंच''च्या वतीने आयोजित रौप्य महोत्सवी २५व्या मासिक संगीत सभेत या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. व्रतस्थपणे संगीताची साधना करणाऱ्या व भारतीय अभिजात संगीतासाठी योगदान देणाऱ्या कलावंतांना योग्य निवड करून हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे ''संगीत साधना मंच'' चे प्रवर्तक श्री. विश्वजीत धाट यांनी सांगितले. या विशेष पुरस्काराबद्दल गुरुवर्य पं. शिवदासजी देगलूरकर, श्री प्राणेश पोरे, अष्टविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रदीपभाऊ राठी, आवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री अभय शहा, डॉ. संदिपान जगदाळे, डॉ. रवीराज पोरे प्रा. हरीसर्वोत्तम जोशी इ. सह संगीत क्षेत्रातील अनेक कलावंत व रसिक, श्रोत्यांनी अभिनंदन केले.



# फेशियल करताना घ्या काळजी

आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना आपला चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार रहावी अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्याम ुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढविण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करीत त्वचे-वरील मृत पेशी, ब्लॅक हेड आणि व्हाईट हेड ना-हीसे करण्याचे काम फ ेशियल थेरपी करीत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

काही लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपी साठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात. तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले. फ ेशियल थेरपी साठी वापरण्यात येण-ारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणविला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे असे समजून त्याचा फेशियल थेरपी साठी वापर करावा.


फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सॅलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करविणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. तसेच फेशियल करविताना आपल्यासाठी वापरण्यात येणारी फेशियल कीट संपूर्णपणे नवी, आणि आधीप-ासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी. आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांच्या मुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वच लालसर होणे अश्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे, किंवा साबणाचा वापर टाळावा. फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांम धील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात. फेशियल नंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

# प्रकाशाच्या वेगाची कहाणी

श्रळसर्हीं ीिीूलहानपणी सूर्य नसता तर असा निबंध परीक्षेत नेहमी येत असे. आता बहुधा हा विषय नसतो. पण आम्ही अगदी कोणकोणती स्वप्ने रंगवून हा निबंध लिहित असू. जेव्हा खगोलशास्त्राचा अभ्यास सुरु झाला तेव्हा या प्रकाशाची अफाट किमया लक्षात आली. प्रकाश ही जगातील कदाचित सर्वात अधिक विस्मयकारक आणि अजूनही अत्यंत गूढ गोष्ट असावी. लहान असतना प्रकाश म्हणजे उजेड, वस्तू दिसतात, प्रकाशसंश्लेषण हेच माहीत असायचे. प्रकाशाचा एक मोठा गुणधर्म आहे त्याचा अफाट वेग! या वेगवरच अवघ्या विश्वाची कोडी उमजायला लागतात. अगदी आईनस्टाईनला देखील याचे अतिशय आकर्षण होते. यातूनच सापेक्षता सिद्धांत जन्माला आला.प्रकाशाचा वेग शोधण्याची कामे अनेक शास्त्रज्ञांनी केली आहेत. सतराव्या शतकाच्या पूर्वीपासून हे प्रयत्न चालूच होते. पण त्यावेळी प्रकाशाला वेग असतो हेच मुळी वैज्ञानिकांना मान्य नव्हते. प्रकाश हा अगदी क्षणार्धात कितीही अंतर पार पाडू शकतो असे त्यांचे म्हणणे होते. पण हा किडा काही वैज्ञानिकांना स्वस्थ बसू देत नव्हता.

१६३८ मध्ये गलिलिओने असे सांगितले की प्रकाशाचा वेग हा ध्वनीपेक्षा किमान दहापट तरी जास्त आहे. प्रकाशाचा वेग शोधण्याचा प्रयत्न करणारा पहिला वैज्ञानिक म्हणून गलिलिओला श्रेय दिले जाते. त्याची पद्धत फार साधी होती. त्याने काय केलं? गलिलिओ आणि त्याचा सहकारी अशा दोघांनी दोन दिवे घेतले. दोघांनी दोन्ही पेटत्या दिव्यांना झाकून ठेवले. गलिलिओने त्याच्या दिव्यावर कव्हर काढले की त्याचा सहकारी दिव्यावरचे कव्हर काढायचा. या दोन्ही क्रियांमधला वेळेचा फरक आणि दिव्यांमधले अंतर नोंदवले जायचे. याचे अनेक प्रयोग केले गेले. यामधून आपल्याला प्रकाशाचा वेग समजेल असे त्याचे म्हणणे होते. त्याने असा निष्कर्ष काढला की तत्क्षणी पोहोचत नसला तरी प्रकाशाचा वेग हा असाधारण जलद आहे. ध्वनीच्या वेगापेक्षा किमान दहापट असावा असा अंदाज वर्तवला होत १६७५ मध्ये ओले रोमर नावाच्या वैज्ञानिकाने हा वेग सेकंदाला दोन लाख किलोमीटर असावा असे सांगितले. ओले रोमर हा डॅनिश खग-ोलशास्त्रज्ञ होता. याने गुरु ग्रहांच्या उपग्रहांचे निरीक्षण केले. त्याने असे सांगितले की पृथ्वी आणि गुरु या दोन ग्रहांच्या सापेक्ष स्थितीवर गुरु ग्रहांची ग्रहणे अवलंबून असतात. जर पृथ्वी जवळ असेल तर गुरुच्या उपग्रहांची कक्षेमध्ये फिरण्याची गती वाढते आणि जर पृथ्वी लांब असेल तर ही गती कमी होते. ग्रहणे हा प्रकाश आणि सावल्यांचा खेळ असतो. त्याने असे सांगितले की गुरुच्या उपग्रहांच्या गतीवर होणारा परिणाम हा पृथ्वी दूर असताना प्रकाशाला पोहोचण्यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त वेळेचा प्रभाव आहे. पृथ्वीच्या कक्षेचा व्यास लक्षात घेऊन त्याने असा निष्कर्ष काढला की प्रकाशाचा वेग हा सेकंदाला दोन लाख किलोमीटर इतका आहे. त्याने केलेली गणिते ही गुंतागुंतीची होती. ही संख्या बरोबर नाही हे आज आपल्याला माहित असले तरी हा अगदी ठोस प्रयत्न होता आणि म्हणून हा महत्त्वाचा ठरतो.१७२८ मध्ये जेम्स ब्रॅडली या वैज्ञानिकाने हा वेग निर्वातामध्ये तीन लाख एक हजार किलोमीटर प्रती सेकंद इतका आहे असे सांगितले. जेम्स ब्रॅडली हा ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ होता. हा खूप महत्त्वाचा टप्पा होता. प्रकाशाची गती मोजण्यासाठी त्याने ताऱ्याच्या विचलनाचा उपयोग करून घेतला. पृथ्वी सुर्याभावती फिरत असल्याने ताऱ्यांच्या विचलनामुळे ताऱ्यांचे दृश्य स्थान बदलते. ताऱ्याचे विचलन म्हणजे पृथ्वीचा सूर्याभोवती फिरण्याचा वेग आणि प्रकाशाचा वेग यांचे गुणोत्तर होय. पृथ्वीचा सूर्याभोवती फिरण्याचा वेग जेम्स ब्रॅडलीला माहित होता. तसेच ताऱ्याच्या विचलनाचा कोन माहित होता. यावरून त्याने प्रकाशाचा वेग शोधला. हा वेग आज माहित असलेल्या वेगाच्या अगदी जवळ जाणारा आहे. श्रळसर्हीं ीिीूहिप्पीलाईट लुई फुझेऊ नावाचा फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ होता. त्याच्या गणिताप्रमाणे हा वेग तीन लक्ष तेरा हजार किलोमीटर प्रतीसेकंद इतका होता. हा शोध त्याने १८४९ मध्ये लावला. त्याने दात असलेले एक चाक घेतले. चाकाच्या दोन दातांमधून प्रकाशाला सोडले. त्या चाकापासून साधारण ८ किलोमीटर अंतरावर एक आरसा ठेवला होता. त्यातून हा प्रकाश परावर्तीत होऊन त्याच फटीमध्ये परत आला. या चाकाला सुमारे शंभर दात होते. चाक एका सेकंदाला १०० फेऱ्या पूर्ण करीत होते. यामुळे सेकंदाचा सूक्ष्म भाग मोजणे शक्य होते. चाकाचा वेग बदलून प्रकाशाच्या वेगामध्ये काही फरक पडतो आहे का हे त्याने तपासले. त्याला प्रकाश किती अंतराने आणि किती वेळात परत आला हे माहीत होते. यावरून वेगाची संख्या काढणे सोपे होते. आणि ही संख्या वास्तव वेगाच्या अगदी जवळ जाणारी होती. फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ, लिओन फॉउल्ट, याने देखील फझेऊसारखीच पद्धत वापरली. त्याने फिरत्या आरशाचा आणि स्थिर आरशाचा वापर केला. आरसा फिरता असल्याने परत येणाऱ्या एका किरणापेक्षा दुसऱ्या किरणाच्या परिवर्तित प्रकाशामधील कोन भिन्न असायचा. याचा उपयोग करून लिओन फॉउल्ट याने अनेक प्रयोग करून, १८६२ मध्ये प्रकाशाचा वेग २९९,७९६ किलोमीटर प्रती सेकंद आहे असे सांगितले. ही संख्या मोघम नव्हती तर बऱ्यापैकी अचूकतेच्या जवळ जाणारी होती. आज आपल्याला अचूक संख्या माहीत आहे ती म्हणजे २९९,७९२.४५७४ औ ०.००११ किलोमीटर प्रती सेकंद !अमेरिकन नॅशनल ब्युरो ऑफ स्टँडर्डस्ने मान्य केलेला वेग आहे २९९,७९२.४५७४ किलोमीटर प्रती सेकंद, तर ब्रिटिश राष्ट्रीय भौतिक प्रयोगशाळेने मान्य केलेला वेग आहे २९९,७९२.४५९० किलोमीटर प्रती सेकंद! आज जगामध्ये प्रकाशाचा वेग २९९,७९२.४५८ किलोमीटर प्रती सेकंद हा मान्य केला आहे. पुढे जाऊन प्रकाशाचा वेग हे खगोलशास्त्रामधे मोठे एकक झाले, अनेक शोधांचे जनक झाले. आज दूरवरच्या म्हणजे अब्जा-वधी प्रकाशवर्षे दूर असलेल्या अवकाशीय






# बर्फाचा गोळा (सफर अंतराळाची)

बालमित्रानो, सूर्यमालेतील बरेच ग्रह तुम्हाला ठाऊक असतील. प्लुटोचे नाव तुम्ही ऐंकले असेलच, हा सूर्यमालेतील शेवटचा ग्रह आहे. त्याच्यावर भयानक थंडी आहे. त्यावरील तपमान वजा २९० सेल्सियस एवढे कमी आहे. म्हणून त्याला गोठलेल्या वायूंचा स्नोबॉल (बर्फाचा गोळा) असे म्हणतात. आपल्याकडे त्याला 'कुबेर' म्हण-तात. सूर्याभोवती पृथ्वीपेक्षा चाळीसपट अधिक अंतरावरून तो लंबवर्तुळाकार फेरी मारतो. तब्बल २४८.७५ वर्षे त्याला ही प्रदक्षिणा घालण्यास वेळ लागतो. या प्रदक्षिणा काळात सूर्यापासून त्याचे सर्वात जवळचे अंतर ४५० कोटी किलोमीटर व सर्वात लाबंचे अंतर ७५० कोटी किलोमीटर असते. तर स्वत:भोवती फेरी मारण्यास ६ दिवस ९ तास ला-गतात.

या ग्रहाचा शोध प्रो. पेरसिव्हल यांनी मोठया चिकाटीने व जिद्दीने लावला. नेपच्यूनच्या पलीकडे एक ग्रह असावा या कल्पनेने त्यांनी अचूक गणित मांडून अमक्या ठिकाणी तो दिसेल असे सांगून लिहून ठेवले होते. पण प्रत्यक्षात तो पाहण्याआधी त्यांचे निधन झाले. मग जवळ जवळ १४ वर्षानी त्यांच्या शिष्याने क्लाईड टॉमबाघ याने १९३० साली ग्रह शोधून काढला. अर्थात बापल्या गुरूंच्या गणिताप्रमाणे. आता हे लक्षपूर्वक गंमतीचे वाचा प्लुटो हा जरी शेवटचा ग्रह असला तरी सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतांना त्याचा भ्रमण कक्षेचा काही भाग नेपच्यूनच्या भ्रमणकक्षेच्या आत येतो. म्हणजेच तेवढया काळापुरता नेपच्यून हा शेवटचा ग्रह ठरला जातो. हा कालावधी १९७९ ते १९९९ पर्यत होता. मग त्यानंतर पुन्हा प्लुटो हा सर्वात शेवटचा ग्रह बनला. काही शास्त्रज्ञांच्या मते (उपग्रह) अस-ावा. परंतू १९७८ साली खुद्द प्लुटोलाच एक चंद्र असल्याचा शोध लागला. जेम्स ख्रिस्ती याने शक्तिशाली दुर्बिणीच्या साहय्याने त्याचा शोध लावला. त्याचा आकार प्लुटोच्या निम्म्याने आहे. म्हणजे हा प्लुटोचा जुना भाऊ असावा का? आणि मग आपल्या कुडंलीत ज्योतिष शास्त्रातही नवग्रहाऐवजी दशग्रहांचा उल्लेख होऊ लागेल (?) आहे की नाही गंमतअसे हे शोध -शोधक-ग्रह आणि उपग्रह .- शारदा बेलगांवकर

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**अल्झायमर प्रतिबंध**



- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो. ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.

अल्झायमरग्रस्तांना समजून घेताना

## २ Joke विनोद





गिऱ्हाईक : मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला ङ्गटिपफ द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या म ालकाला दिली.
वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## ३ Message संदेश



Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi, 1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## ४ Thought सुविचार




राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.- **अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्नि, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ** – अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

२. रावण
५. सामाजिक नातेसंबंध
९. आश्रय
१२. चुकीचा अर्थ लावणे, गैरअर्थ
१३. वस्ती
१४. ग्रामीण बोलीत पुष्कळ, चिक्कार
१६. नंतर
१७. द्युतात हरल्यामुळे पांडवांना झालेली शिक्षा
२०. रम्य
२१. दाटी
२२. सुदैवी
२३. पुत्र
२५. नूतन
२६. भाकरीबरोबरचे लोकप्रिय कालवण
२८. भातलावणीसाठी तयार केलेले खड्डे
२९. वस्त्र
३३. रस्ता
३४. जनानखाना
३६. श्रावणात याची सार्वधिक पूजा होते
३७. क्रोध
३९. गाढव
४१. व्यापारी
४३. प्रजा
४५. पराभव
४६. खोटा, कृत्रिम
४८. सुखद गार
४९. निष्णात
५०. श्रीरामाची पत्नी
५१. गुंड
५२. खोट्याचा डाव
५२अ.प्रयत्न
५४. आयुर्वेदिक केशतेलातली एक वनस्पती
५६. बेडूक
५८. दीप
५९. तमाशा
६१. पायपीट
६२. हल्ली
६३. पुष्पपराग
६५. चपखल प्रत्युत्तर देणारा
६७. वेतन
६९. श्रीमंत
७०. गाठोडे
७३. तांबडा
७४. देऊळ
७५. अविवाहित पुरुष
७७. ख्रिस्ती प्रार्थनास्थान
७८. समशेर
७९. विलंब
८०. टोमणा

### उभे शब्द


१. सूर्य
२. खलाशी
३. शिक्षा
४. काम होण्यासाठी देवाशी करार
५. सोशिक
६. मारला गेलेला
७. नवरामुलगा
८. गाव
१०. प्रसंगावधान
११. संताप
१५. भागाबाईला नाचवणारे वाद्य
१८. शिवभक्तांचे मुख्य तीर्थस्थान, बनारस
१९. सुगंध
२१. तंबोऱ्याचे वेष्टन
२४. होडी
२५. दसऱ्याआधीचा उत्सव
२७. विहीर
३०. भ्रतार
३१. अनुभव, प्रचीती
३२. धाक
३३. उत्सवाचा दिवस
३५. पतीचे घर
३७. अरिष्ट
३८. कुशल
४०. घाबरलेला
४२. जादूगाराची पिशवी
४४. सुरुवात
४५. वस्त्र विणण्याचे साधन
४६. वेलींचा मांडव
४७. हात राखून खर्च करणे
४८. ईदचे मिष्टान्न
५२. नेहरूंचे नाव
५३. अकबराच्या दरबारातील नऊ कर्तबगार
५५. बंदुकीची गोळी
५७. नेत्रांजन
६०. सळई
६१. ताकीद
६४. पाण्यातील सजीव
६६. पुन्हा पुन्हा
६८. वाहन
७०. पत्नी
७१. असंमती
७२. उपासना
७४. देशातच तयार झालेले
७६. भस्म

### आडवे उत्तर

२.दशानन ५.सहजीवन ९.आ-सरा १२.विपर्यास १३.वसाहत १४.रगड १६.मग १७.वनवास २०.रमणीय २१.गर्दी २२.नशीबवान २३.सूत २५.नव २६.झुणका २८.खाचर २९.वसन ३३.सडक ३४.राणीवसा ३६.सत्यनारायण ३७.संताप ३९.रासभ ४१.वाणी ४३.रयत ४५.हार ४६.लटका ४८.शीतल ४९.पारंगत ५०.सीता ५१.टग्या ५२.रडी ५२अ.जतन ५४.माका ५६.मंडूक ५८.दिवा ५९.वग ६१.तंगडतोड ६२.सध्या ६३.रज ६५.हजरजवाबी ६७.पगार ६९.मालदार ७०.बासन ७३.लाल ७४.देवालय ७५.कारा ७७.चर्च ७८.करवाल ७९.उशीर ८०.कोपरखळी

### उभे उत्तर

१.सविता २.दर्यावर्दी ३.शासन ४.नवस ५.सहनशील ६.हत ७.वर ८.नगर १०.समयसूचकता ११.राग १५.डमरु १८.वाराणसी १९.सुवास २१.गवसणी २४.तर २५.नवरात्र २७.आड ३०.नवरा ३१.प्रत्यय ३२.दरारा ३३.सणवार ३५.सासर ३७.संकट ३८.पटू ४०.भयभीत ४२.पोतडी ४४.आरंभ ४५.हातमाग ४६.लतामंडप ४७.काटकसर ४८.शीरकुरमा ५२.जवाहरलाल ५३.नवरत्ने ५५.काडतूस ५७.सुरमा ६०.गज ६१.तंबी ६४.जलचर ६६.वारंवार ६८.गाडी ७०.बायको ७१.नकार ७२.अर्चना ७४.देशी ७६.राख



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### दिग्गज खेळाडूंचं संघात पुनरागमन

**वेलिंग्टन**–न्यूझीलंड क्रिकेट संघाबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. न्यूझीलंडनं बांगलादेश दौऱ्यासाठी आपला संघ जाहीर केला आहे. दुखापतीमुळं बऱ्याच काळापासून संघाबाहेर असलेले अनेक स्टार खेळाडू संघात परतले आहेत.

वनडे आणि टी–२० मालिकेसाठी जाहीर केला संघ : न्यूझीलंड क्रिकेट संघानं या महिन्याच्या अखेरीस बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या वनडे आणि टी–२० मालिकेसाठी आपला १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. सर्वात मोठी बातमी म्हणजे वेगवान गोलंदाज मॅट फिशर, विल ओफ्रूर्क आणि ब्लेअर टिकनर यांचं संघात पुनरागमन झालं आहे. हे तिन्ही खेळाडू दुखापतीमुळं बऱ्याच काळापासून संघाबाहेर होते. पाठीच्या दुखापतीतून सावरल्यानंतर ओफ्रूर्क वनडे संघात परतला आहे, तर फिशर टी–२० संघात सामील झाला आहे. टिकनर दुखापतीतून सावरला आहे, त्यामुळंच त्याला दोन्ही फॉरमॅटमध्ये संघात स्थान मिळवता आले आहे.

प्रशिक्षकांनी व्यक्त केला आनंद : मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी खेळाडूंच्या पुनरागमनाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले की, या खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांपासून खूप मेहनत घेतली आहे आणि त्यांचं पुनरागमन संघासाठी महत्त्वाचं आहे. सध्या सुरु असलेल्या क्रिकेट हंगामाच्या पार्श्वभूमीवर, एक मजबूत राखीव खेळाडू असणं अत्यंत आवश्यक आहे.

### महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

मुंबई –बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया (बीएफआय) च्या निरीक्षकांच्या उपस्थितीत मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत, माजी खासदार राहुल शेवाळे यांची महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दादरच्या स्वातंर्त्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात १ मार्च रोजी पार पडलेल्या निवडणुकीत राज्यभरातील २५ संघटनांच्या एकूण ५० प्रतिनिधींनी एकमताने शेवाळे यांच्यासह एकूण १३ पदाधिकाऱ्यांना बिनविरोध निवडून दिले होते. कायदेशीर बाबींची पूर्तता करून नियमानुसार, नुकतीच बीएफआयने या संघटनेला मान्यता दिली. या संघटनेच्या वरिष्ठ उपाध्यक्ष पदी रणजीत सावरकर, सचिव पदी डॉ. राकेश तिवारी, कोषाध्यक्ष पदी मिलन वैद्य तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनिल त्रिवेदी यांची निवड करण्यात आली आहे.तसेच अर्जुन पुरस्कार विजेते कॅप्टन गोपाळ देवांग आणि ओलंपियन मनोज पिंगळे यांचा देखील कार्यकारणीत समावेश आहे. राज्यभरातील एकूण २५ जिल्हास्तरीय बॉक्सिंग संघटनांची शिखर संस्था म्हणून बीएफआयशी समन्वय साधण्याची आणि राज्यभरातील बॉक्सिंगपटूंना हक्काचे व्यासपीठ देण्याची महत्त्वाची भूमिका होती.

### आफ्रिदीवर पीसीबीची मोठी कारवाई, ठोठावला इतक्या लाखांचा दंड

कराची –पाकिस्तान सुपर लीग दरम्यान शिस्तभंगाचा एक मोठा प्रकार समोर आला आहे. शाहीन आफ्रिदी या लाहोर कलंदर्सच्या कर्णधारावर टीम हॉटेलमधील सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १० लाख पाकिस्तानी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. संघात शिस्त आणि जबाबदारी टिकवून ठेवण्यासाठी फ्रँचायझीकडून हा निर्णय घेण्यात आला.ही घटना तेव्हा घडली, जेव्हा शाहीन आफ्रिदी आणि सिकंदर रझा यांच्यावर हॉटेलमध्ये बाहेरील पाहुण्यांना बोलावल्याचा आरोप झाला. वृत्तांनुसार, सिकंदर रझाच्या खोलीत चार पाहुण्यांना आणण्याची परवानगी मागण्यात आली होती. मात्र, सुरक्षा कारणांमुळे ती विनंती अधिकाऱ्यांनी स्पष्टपणे नाकारली होती. तरीसुद्धा, शाहीन आणि रझा यांनी कथितरित्या त्या पाहुण्यांना रात्री सुमारे ११ वाजता खोलीत आणले. हे पाहुणे पहाटे १:२५ वाजेपर्यंत तिथेच थांबले होते, अशी माहिती समोर आली आहे. लाहोर कलंदर्सने अधिकृत निवेदनात सांगितले की, ही कारवाई जबाबदारीने उचललेले पाऊल आहे.

# पंजाबचा गुजरातवर रोमांचक विजय



### कुपर कॉनोली ठरला विजयाचा हिरो



नवी मुंबई: आयपीएल २०२६ मधील चौथा सामना पंजाब किंग्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना खेळवला गेला.

पंजाब किंग्सचा गुजरातवर दणदणीत विजय

गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्स यांच्यात आयपीएल २०२६ मधील सामना चांगलाच अटीतटीचा झाला. अखेरच्या षटकांपर्यंत सामन्याचं माप सातत्याने दोन्ही बाजूच्या दिशेने झुकत होता. कधी गुजरातचे गोलंदाज तर कधी पंजाबचे फलंदाज बाजी मारत होते. पण अखेरीस पंजाब किंग्सने विजय आपल्या बाजूने झुकवला. पंजाब किंग्सच्या या विजयाचा हिरो कुपर कॉनोली ठरला. एका टोकाकडून लागोपाठ विकेट्स पडत असताना कॉनोलीने एकट्याने संघाचा डाव सावरला आणि संघाला विजय मिळवून देतच माघारी परतला.

गुजरातने दिलेल्या १६३ धावांचा पाठलाग करताना प्रियांश आर्यने षटकाराने सुरूवात केली. पण रबाडाच्या चेंडूवर तो झेलबाद झाला. यानंतर कुपर कॉनोली व प्रभसिमरन सिंग यांनी दुसऱ्या विकेटसाठी ७६ धावांची भागीदारी रचली. प्रभसिमरन २४ चेंडूत ३७ धावा करत बाद झाला. तर श्रेयस अय्यर २ दणदणीत षटकार लगावत बाद झाला. पंजाबची स्थिती एका वेळेस ११० धावांवर २ विकेट्स अशी होती आणि लागोपाठ विकेट्स गमावल्यानंतर संघाने ११८ धावांवर ६ विकेट्स गमावल्या.

प्रसिध कृष्णाला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून १२ व्या षटकात गोलंदाजीला आणलं आणि त्याने २ षटकांत ३ विकेट्स घेत पंजाबपासून सामना दूर नेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान एका टोकाकडून विकेट्स पडत असताना पदार्पणवीर कुपर कॉनोलीने अर्धशतक झळकावत संघाचा डाव सावरत होता. मार्को यान्सनने कॉनोलीला चांगली साथ दिली. पण १८व्या षटकात यान्सन अशोक शर्माच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. यानंतर आलेल्या झेवियर बार्टलेटने प्रसिद्ध कृष्णाच्या १९व्या षटकात षटकार खेचला आणि संघाला विजयाच्या अधिक जवळ नेलं.पंजाब किंग्सने सामन्याची नाणेफेक जिंकत गुजरातला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. गुजरातकडून साई सुदर्शन व शुबमन गिलच्या जोडीने सावध सुरूवात केली. पण मार्को यान्सने साईला बाद करत संघाला ब्रेकथ्रू मिळवून दिला. त्यानंतर शुबमन गिल व जोस बटलरने सावध फलंदाजी केल्या. गिल २७ चेंडूत ३९ धावा करत बाद झाला तर जोस बटलरने ३८ धावांचं योगदान दिलं. तर ग्लेन फिलिप्स २५ धावा आणि वॉशिंग्टन सुंदरने १८ धावांचं योगदान देत संघाला १६२ धावांपर्यंत नेलं. श्रेयस अय्यरचं उत्तम नेतृत्त्व आणि गोलंदाजीत बदल केल्यामुळे गुजरातला फारश्या धावा करण्याची संधी मिळाली नाही. पंजाबकडून मार्को यान्सनने १ विकेट तर युझवेंद्र चहलने २ आणि विजयकुमार वैशाकने प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

# मुंबई इंडियन्सच्या मॅचनंतर विल्यम लेग्नफोर्ड गूढ मृत्यू

## मरिन ड्राईव्हच्या प्रसिद्ध हॉटेलमध्ये सापडला मृतदेह!



मुंबई–मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर सामना खेळवला गेला होता. या सामन्यात मुंबई इंडियन्सने १३ वर्षाचा रेकॉर्ड मोडून मॅच जिंकली. पण या मॅचनंतर धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबई इंडियन्सच्या विजयानंतर दुसऱ्या दिवशी मुंबईतील मरिन ड्राईव्ह परिसरातील ट्रायडन्ट हॉटेलमध्ये बीसीसीआयशी संबंधित असलेल्या एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे.

बीसीसीआयच्या ब्रँड कास्ट इंजिनियरचा मुंबईत गूढ मृत्यू

बीसीसीआयच्या ब्रँड कास्ट इंजिनियरचा मुंबईत गूढ मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तो आयपीएलसाठी मुंबईमध्ये आला आहे. विल्यम लेग्नफोर्ड असं या ब्रँड कास्ट इंजिनियर नाव आहे. तो मुंबईच्या प्रसिद्ध ट्रायडन्टमध्ये राहत होता. २४ मार्चपासून तो इथं राहत होता. २९ मार्चला मॅच संपल्यानंतर रूम नंबर २७१५ मध्ये आले होते. ३० मार्च रोजी जेव्हा रिसेप्शनिस्टने त्यांना फोन केला, तेव्हा कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. विल्यम्स लेग्नफोर्ड मूळचे ब्रिटिश नागरिक आहेत.हॉटेल कर्मचाऱ्यांना रुममध्ये गेल्यावरही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मास्टरचावीने रुम उघडल्यावर हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हॉटेल कर्मचाऱ्यांना तातडीने डॉक्टरांना बोलवलं असताना विल्यम लेग्नफोर्ड यांना मृत घोषित करण्यात आलं. या प्रकरणात मरिन ड्राईव्ह पोलीस चौकीत मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. दरम्यान, पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट नाही. वैद्यकीय अहवालानंतर अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणात

# वैभवला तातडीने इंग्लंडला पाठवण्यासाठी बीसीसीआयला अपील



वैभव सूर्यवंशीच्या हातात बॅट दिली की चमत्कार घडतात आणि एकापेक्षा एक विक्रम मोडतात. ताशी १५५ किमी वेगाने गोलंदाजी करणाऱ्या वेगवान गोलंदाजांसमोर उभा केलं तरी तो सहज फटकेबाजी करतो. आयपीएलमध्ये फलंदाजीला उतरला की अनुभवी गोलंदाजांनी सजलेल्या विजेतेपद पटकावलेल्या संघांविरुद्धही ३५ चेंडूत शतक ठोकतो. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया किंवा दक्षिण आफ्रिका कुठेही खेळला तरी सूर्यवंशी तितक्याच दमदार कामगिरीने मैदान गाजवेल. अवघ्या एका वर्षाच्या कारकिर्दीत त्याच्या यशाचं पारडं अपयशापेक्षा खूप जड आहे. त्याची आयपीएल २०२६ मधील पहिल्या सामन्यातील खेळी पाहून बीसीसीआयला अपील करण्यात आलं आहे.

इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉ याला वैभव सूर्यवंशीला लवकरात लवकर भारताच्या वरिष्ठ पुरुष संघात स्थान द्यावं असं वाटतं. आयपीएल २०२६च्या तिसऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध १७ चेंडूत ५२ धावांची तुफानी खेळी केल्यानंतर वॉन इतका प्रभावित झाला की सूर्यवंशीने आपल्या वरिष्ठ सलामी जोडीदार यशस्वी जैस्वालचंही लक्ष वेधून घेतलं, असं त्याचं मत आहे.गेल्या १२ महिन्यांत या डावखुऱ्या फलंदाजाची कामगिरी अफलातून राहिली आहे. कोणत्याही अडचणीशिवाय त्याने भरपूर धावा केल्या आहेत. आयपीएलपुरतंच नाही, तर भारताच्या अंडर–१९ संघाकडून खेळताना इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेतही त्याने शतकं झळकावत आपली छाप पाडली. अंडर–१९ विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडविरुद्ध केवळ ८० चेंडूत १५ षटकार आणि तितकेच चौकार मारत त्याने १७५ धावांची खेळी करत एकहाती भारताला विजेतेपद मिळवून दिलं.मायकेल वॉ म्हणाले, ङ्गतो भारतासाठी कधी पदार्पण करणार? कदाचित आपण थोडा पुढचा विचार करतोय, कारण आयपीएलमधील ही त्याची पहिलीच खेळी आहे. पण काही महिन्यांत इंग्लंडचा व्हाईट–बॉल दौरा आहे आणि मी भारतीय क्रिकेटच्या जागी असतो, तर त्याला त्या दौऱ्यावर नक्कीच नेलं असतं. तो लगेच सध्याच्या संघातील खेळाडूंची जागा घेईल असं नाही, पण त्याला भारतीय संघाच्या वातावरणाची सवय होणं खूप गरजेचं आहे. त्याला संघात घ्या, त्याला त्या वातावरणात राहू द्या. एक–दोन सामने खेळायला

# सचिनचं पहिलं शतक आलं होतं त्यांच्या बॅटने...अनिल गुरव यांचं निधन

मुंबई –क्रिकेट वर्तुळातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकर ज्यांना सर म्हणायचा आणि ज्यांच्या बॅटीने त्याने आपल्या कारकिर्दितील पहिले शतक ठोकले, ते दिग्गज खेळाडू अनिल गुरव यांचे निधन झालं आहे.त्यामुळे क्रिकेट वर्तुळात शोककळा पसरली आहे.

मुंबई क्रिकेटमध्ये अनिल गुरव हे मोठं नाव होतं. कारण रमाकांत आचरेकर स्वत:सचिन तेंडुलकरला त्यांच्या फलंदाजी पाहायला सांगायचे.सचिन तेंडुलकर जेव्हा शिवाजी पार्कवर सरावासाठी यायचा, तेव्हा तो त्यांना अनिल सर म्हणायचा.

अनिल गुरव यांची फलंदाजीची शैली इतकी जबरदस्त होती की, त्यांची तुलना वेस्ट इंडिजच्या विव्ह रिचर्डशी यांच्याशी व्हायची. तसेच ज्या बॅटीने सचिन तेंडुलकरने आपल्या कारकिर्दितले पहिले शतक ठोकले, ती बॅट अनिल गुरव यांनीच त्याला दिली होती.

दरम्यान ज्या काळात सचिन तेंडुलकर आपल्या यशशिखरावर होता,त्याच काळात अनिल गुरव क्रिकेटच्या मुळ प्रवाहातून बाहेर पडले होते. कारण चुकीची सोबत आणि दारूच्या व्यसनामुळे अनिल गुरव यांचे क्रिकेट करिअर उद्ध्वस्त झाले. त्यानंतर अनिल गुरव नालासोपाऱ्यातील एका छोट्याशा चाळीत अत्यंत गरिबीत जीवन जगत होते.पण आज अखेर त्यांची प्राणज्योत माळवली आहे.रमाकांत आचरेकर सर यांनी 'स्टम्पवर नाणे ठेवण्याची'जी पद्धत सूरू केली, जिथे बाद न होणाऱ्या फलंदाजांना मिळायची, ती पद्धत अनिल गुरव यांच्यासाठी सूरू केली. जी नंतर सचिन तेंडुलकरच्या बाबतीतही गाजली होती. दरम्यान आता अनिल गुरव

# बॉल टेम्परिंगच्या विळख्यात अडकला फखर जमान...

कराची–पाकिस्तान सुपर लीग २०२६ मध्ये बॉल टॅम्परिंग म्हणजेच चेंडूशी छेडछाड केल्याचा मोठा वाद समोर आला आहे. या प्रकरणात पाकिस्तानचा धडाकेबाज फलंदाज फखर जमान याच्यावर आरोप करण्यात आले आहेत. तो सध्या लाहोर कलंदर संघाकडून खेळत आहे. २९ मार्च रोजी झालेल्या सहाव्या सामन्यात हा वाद पेटला, ज्यात कराची किंग्स आणि लाहोर कलंदर्स आमनेसामने होते. या घटनेची गंभीर दखल घेत पाकिस्तान क्रिकेट बोर्ड ने चौकशी केली आणि फखर जमानला मलेव्हल–३फउल्लंघनात दोषी ठरवले. परिणामी, त्याच्यावर दोन सामन्यांची बंदी घालण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सुनावणीदरम्यान फखरने स्वत:वरील सर्व आरोप फेटाळले होते. मात्र, पंचांच्या अहवालाच्या आधारे पीसीबीने त्याला दोषी ठरवत निलंबन कायम ठेवले. या प्रकरणात मैदानावरील पंच शाहिद सैकत, फैसल खान आफरीदी, तसेच टीव्ही अंपायर आसिफ याकूब आणि चौथे पंच तारिक रशीद यांनी त्याच्यावर आरोप नोंदवले होते. या बंदीमुळे फखर जमान आगामी मुलतान सुलतान्स आणि इस्लामाबाद युनायटेड विरुद्धचे दोन महत्त्वाचे सामने खेळू शकणार नाही, ज्यामुळे लाहोर कलंदर्सला मोठा धक्का बसला आहे.सामन्यात पंचांना चेंडूशी छेडछाड झाल्याचा संशय आल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली.

# शमीचं टीम इंडियात पुनरागमनाची संधी न मिळाल्याने निवृत्तीबाबत मोठं वक्तव्य

नवी दिल्ली: भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने आयपीएल २०२६ च्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण विधान केलं आहे. शमीने निवृत्तीच्या चर्चांवर मौन सोडलं आहे.

चेहराारव डहराळ डींरींशाशर्पी प ठशींळीशाशर्पी अर्षींशी वशपळशी ळपवळर लोशलरलज्ञ डरळव थहशप ख सशीं ंिळीशव ख ुळश्रश्र श्रशरींश लीळलज्ञशीं

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या अंतिम सामन्यात शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळलेल्या शमीसमोर सध्या भारतीय संघात परतण्याचा मार्ग खडतर आहे. गेल्या काही वर्षांपासून दुखापतींनी त्याच्या कारकिर्दीला ग्रासल आहे आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये ६७ बळी घेऊनही निवड समितीने त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. मात्र, कामगिरी करणे हेच आपलं काम आहे, असे शमीने नेहमीच म्हटलं आहे. संघ निवडीचा निर्णय व्यवस्थापनाकडे असला तरी, निवड समितीने त्याला इंग्लंड दौऱ्यासाठी विचारणा केल्याचेही वृत्त होते, पण त्याने नकार दिला होता.

आयपीएल २०२६ मध्ये शमी लखनौ सुपर जायंट्स संघाकडून खेळेल, ज्यांनी त्याला १० कोटी रुपयांना संघात सामील केलं आहे.

यादरम्यान, शमीने निवृत्तीबद्दल आपले विचार मांडले. शुभंकर मिश्रा यांच्या पॉडकास्टवर त्याने स्पष्टपणे सांगितलं की, ङ्गमी थकलो की क्रिकेटला निरोप देईन. पण सध्या तरी निवृत्तीचा विचारही करत नाही, कारण असे विचार मनाला खचवतात. जर हा विचार मनात आला, तर समजा तुम्ही आधीच थकला आहात आणि थकलात म्हणजे कंटाळा आला आहे. मी आधीही सांगितलं आहे, ज्या दिवशी मला उठल्यावर कंटाळा आल्यासारखं वाटेल, त्या दिवशी मी क्रिकेट सोडेन. त्यामुळे हो, ज्या दिवशी आळस येईल किंवा कंटाळा येईल, त्या दिवशी मी थांबेन. पण सध्या ना मला कंटाळा आला आहे, ना आळस. मी खेळाचा आनंदघेतोय. निकालही चांगले आणि सकारात्मक आहेत.ङ्ग

**या विचारांनी मन खचून गेलं**

स्वतःचं जेवण स्वतः बनवतात, गाई–बैल पाळलेत; नाना पाटेकरांची गावातली दिनचर्या कशी असते? म्हणाले, ङ्गम इझ्या गावातःङ्ग

२००८साली प्रीती झिंटानं पंजाब किंग्जमध्ये केलेली कोट्यवधींची गुंतवणूक, आता खझङमधून किती कमावते? घ्या जाणूनः


राजपाल यादव व पत्नीमध्ये आहे १३ वर्षांचं अंतर; सासू–सासऱ्यांकडून झालेला लग्नाला विरोध; कॅनडामध्ये 'अशी' झालेली पहिली भेट

शमी पुढे म्हणाला, ङ्गगोलंदाज म्हणून मी माझं १०० टक्के देईन. माझ्यावर असलेल्या जबाबदाऱ्या पार पाडेन आणि अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. बाकी नशीब बदलणं माझ्या हातात नाही. मी माझ्या वृत्तीने आणि जिद्दीनेच योगदान देऊ शकतो. लखनौने माझ्यावर विश्वास ठेवला आहे, त्यामुळे मी माझं सर्वस्व देईन. पण खेळताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे समाधान. मी केलेल्या तयारीनुसार मला योग्य निकाल मिळतील का, हा विचार महत्त्वाचा असतो. मी किती देशांतर्गत सामने खेळलो यापेक्षा माझा रिदम ठीक आहे का, यावर मी लक्ष केंद्रित केलं. जर ते व्यवस्थित असेल, तरच मी पुढचं विचार करतो.ङ्ग

पाकिस्तानच्या फखर जमानवर सामने खेळण्याची बंदी, पीसीबीचा मोठा निर्णय; पाकिस्तान क्रिकेटमध्ये घडतंय तरी काय?

मोहम्मद शमीच्या वक्तव्यावरून हे स्पष्ट होतं की, तो अजूनही पूर्णपणे क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यास तयार आहे. तो पुन्हा भारतीय संघात आपले स्थान पक्के करू शकतो का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल.

मोहम्मद शमी आयपीएल २०२६ मध्ये आता १ एप्रिलला दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स सामन्यात खेळताना दिसेल.



## कार्यकर्ताच भाजपची खरी ताकद; वंचितांपर्यंत योजना पोहोचवण्याचे विधानसभा परिषद सभापती राम शिंदे यांचे आवाहन



**औसा/प्रतिनिधी :** समाजातील वंचित आणि शोषित घटकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी निस्वार्थ व समर्पित भावनेने काम करावे, असे आवाहन विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी केले औसा येथे आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय मंडळ प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत झालेल्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी मंचावर आमदार अभिमन्यू पवार, कासारशिरशी मंडळाचे मंडळ अध्यक्ष नाना धुमाळ उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी भारतीय जनता पार्टी ही कार्यकर्त्यांची पार्टी असल्याचे अधोरेखित केले. या पक्षात सामान्य कार्यकर्त्यालाही न्याय मिळतो. मी स्वतः २००५ मध्ये सरपंच निवडणुकीत पराभूत झालो, मात्र पक्षाने माझ्यावर विश्वास ठेवून २००९ मध्ये विधानसभेची उमेदवारी दिली आणि मी आमदार झालो, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांच्या कष्टांचे महत्त्व स्पष्ट केले. आज अनेक सामान्य कार्यकर्ते आमदार, खासदार आणि मंत्री पदांवर कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढे ते म्हणाले की, समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करणे आवश्यक आहे. निस्वार्थ सेवेतूनच जनतेचा विश्वास जिंकता येतो आणि हीच जनता कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहते, असे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी शेतरस्त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामाचा उल्लेखही त्यांनी केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कासार शिरशी मंडळाचे अध्यक्ष नाना धुमाळ उपस्थित होते.याशिवाय, कार्यकर्ते अधिक सक्षम व्हावेत, त्यांच्यात जनसेवेची व देशभक्तीची भावना निर्माण व्हावी यासाठी भारतीय जनता पार्टी विविध प्रशिक्षण अभियान राबवित असल्याचेही राम शिंदे यांनी स्पष्ट केले. या प्रशिक्षण उपक्रमांमुळे कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटी मिळून ते अधिक प्रभावीपणे जनतेची सेवा करू शकतात, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या महाअभियानातून कार्यकर्त्यांना प्रेरणा व दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# विश्वमैदान राष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविणारे केंद्र ठरेल

## आमदार विक्रम काळे यांचा विश्वास; एमआयटीत विश्वमैदान २०२६ चा उत्साहात शुभारंभ





**लातूर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांमधील क्रीडागुणांना चालना देत त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधींचे दालन खुले करून देणारे एमआयटी शिक्षण संकुलातील 'विश्वमैदान' हे आगामी काळात उत्कृष्ट खेळाडू घडविणारे महत्त्वाचे क्रीडा केंद्र ठरेल, असा विश्वास महाराष्ट्र विधान परिषदेचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी व्यक्त केला.

माईर एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूर यांच्या वतीने आयोजित 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी आ. विक्रम काळे बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक सेवा विभागाचे उप संचालक महादेव कसगावडे, माजी रणजी क्रिकेटपटू विशाल गिते, आंतर राष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे-बोपचंडे, आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार, माईर एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे विश्वस्त तुळशीराम दा. कराड, कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, संचालक प्रा. तेजस कराड, स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आमदार विक्रम काळे म्हणाले की, पारंपरिकरीत्या क्रीडा हा विषय कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित मानला जातो. स्पर्धांचे नियोजनही तेच करतात आणि खेळातही तेच सक्रिय असतात. दुसरीकडे वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा पालक आणि समाजाकडून ठेवली जाते. मात्र, वैद्यकीय शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यस्त दिनचर्येतूनही त्यांच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य पुढे यावे, यासाठी डॉ. हनुमंत कराड यांनी 'विश्वमैदान' सारखी आगळीवेगळी स्पर्धा सुरू केली, ही अत्यंत स्वागतार्ह बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एकेकाळी मुले नैसर्गिकरीत्या खेळात रमलेली दिसायची; परंतु आज खेळाकडे करिअरच्या दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. आज विविध खेळांमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करिअर घडविण्याच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या मंचावर उपस्थित असलेले यशस्वी खेळाडू हे त्याचे जिवंत उदाहरण आहेत. त्यांनी संघर्षातून वाटचाल करून यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनप्रवासातून प्रेरणा घेऊन केवळ डॉक्टरच नव्हे, तर उत्कृष्ट खेळाडू होण्याचाही ध्यास घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

आंतरराष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार यांचा उल्लेख करताना आमदार काळे म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीतही ध्येय डोळ्यांसमोर ठेवून जिद्दीने प्रयत्न केल्यास मोठे यश मिळविता येते. त्यांनी कठीण परिस्थितीतून मार्ग काढत आंतरराष्ट्रीय स्तर गाठला आहे. अशा यशस्वी खेळाडूकडून विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळेल. 'विश्वमैदान'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, जिद्द आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध योजना राबवत असल्याचे सांगताना त्यांनी राज्य शासनाने खेळाडूंसाठी पाच टक्के नोकऱ्या आरक्षित केल्याचेही स्पष्ट केले. राज्य, राष्ट्रीय आणि ऑलिंपिक स्तरावर पोहोचणाऱ्या खेळाडूंना वर्ग एक ते तीन मधील नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मात्र, खेळाडू म्हणून सिद्ध होण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्य आणि वेळ द्यावा लागतो. हार-जीत हा खेळाचा अविभाज्य भाग असला तरी पराभवाने खचून न जाता, 'पुढची स्पर्धा माझीच असेल आणि मीच जिंकणार,' या आत्मविश्वासाने पुढे जाणे आवश्यक असल्याची प्रेरणा आ. काळे यांनी दिली.

यावेळी बोलताना क्रीडा व युवक सेवा विभागाचे उपसंचालक महादेव कसगावडे म्हणाले की, अशा दर्जेदार आणि नियोजनबद्ध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणारी एमआयटी ही पहिली खासगी संस्था असल्याचे विशेषत्वाने नमूद करावे लागेल. आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडावेत यासाठी शासन प्रयत्नशील असून, आजच्या काळात खेळासाठी मानसशास्त्र आणि क्रीडा फिजिओथेरपी यांचे महत्त्व वाढले असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतर राष्ट्रीय बेसबॉल खेळाडू ज्योती पवार म्हणाल्या की, मी शालेय जीवनातच खेळाला सुरुवात केली आणि पुढे महाविद्यालयीन स्तरावर सातत्याने यश संपादन केले. मात्र, या प्रवासात अनेक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थितींचा सामना करावा लागला. अशा वेळी शाहू महाविद्यालयाने त्यांच्या खेळाची जबाबदारी स्वीकारली आणि त्या आपल्या ध्येयापर्यंत पोहोचू शकल्या. एमआयटीसारखी संस्था विद्यार्थ्यांच्या खेळाडू वृत्तीला प्रोत्साहन देत असल्याचा त्यांना मनस्वी आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय नेमबाज जागृती चंदनकेरे-बोपचंडे यांनीही 'विश्वमैदान'चे कौतुक करताना सांगितले की, या स्पर्धेचे आयोजन राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांच्या तोडीस तोड आहे. खेळामुळे केवळ शारीरिक आरोग्य सुधारत नाही, तर व्यक्तिमत्त्वाला समाजात लौकिकही मिळतो. विशेषतः वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अशा स्पर्धांचे आयोजन ही अत्यंत चांगली बाब असून, इतर महाविद्यालयांनीही याचा आदर्श घ्यावा, असे त्यांनी नमूद केले. जीवनात चांगले वर्तन, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्यामुळेच चांगले भविष्य घडते, असे त्या म्हणाल्या.

यावेळी अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, 'विश्वमैदान २०२६' हा केवळ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, आरोग्यदायी जीवनशैली साठी आणि राष्ट्र निर्मितीच्या भावनेला बळ देणारा व्यापक उपक्रम आहे. खेळामुळे शारीरिक सुदृढता, मानसिक ताकद, शिस्त, संघ भावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने खेळाशी जोडले गेले पाहिजे. 'विश्वमैदान'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा, स्पर्धात्मक वातावरण आणि खेळातून करिअरच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते पवित्र क्रीडा ज्योत प्रज्वलित करण्यात आली. ही ज्योत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे जनरल सेक्रेटरी शशांक सांगळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. त्यानंतर विविध वैद्यकीय महाविद्यालयांच्या जनरल सेक्रेटरींच्या हस्ते ती पुढे नेण्यात आली आणि अखेरीस पुन्हा मान्यवरांकडे सुपूर्द करण्यात आली. यानंतर सहभागी विविध महाविद्यालयांतील खेळाडूंनी शिस्तबद्ध संचलनात सहभाग नोंदविला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते व्हॉलीबॉल स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्पर्धा संयोजिका डॉ. वर्षा सांगळे यांनी प्रास्ताविकातून स्पर्धेच्या उद्दिष्टांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहा गणमुखी, डॉ. स्नेहा चोले आणि परमेश्वर सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

या प्रसंगी मांजरा आयुर्वेदिकचे अधिष्ठाता डॉ. आनंद पवार, श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेच्या अधिष्ठाता डॉ. शारदा धडे, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उपप्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, प्राचार्य सायस मुंढे, प्रा. आशा फुंदे यांच्यासह संयोजन समितीचे पदाधिकारी, विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील खेळाडू, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग : मुख्यमंत्री



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर

एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टवके रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया. ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

## युवकांनी नेतृत्व विकासासाठी डिजिटल प्रोफाइल घडवणे काळाची गरज डॉ. रामेश्वर स्वामी




**लातूर/प्रतिनिधी :** भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचालित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात ''डिजिटल युगातील युवकांचे नेतृत्व'' या विषयावर प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. रामेश्वर स्वामी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. कार्यक्रमास बुधोडा येथील अंध-अपंग स्वाधार केंद्राचे संचालक श्री. हरिश्चंद्र सुडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. रामेश्वर स्वामी यांनी सांगितले की, डिजिटल युगात युवकांनी स्वतःचे प्रभावी प्रोफाइल तयार करून नेतृत्वगुण विकसित करणे आवश्यक आहे. सोशल मीडियावरील विविध ॲप्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मचा योग्य वापर केल्यास युवक आत्मनिर्भर व स्वावलंबी बनू शकतात. तसेच डिजिटल माध्यमांचा केवळ मनोरंजनासाठी वापर न करता त्यातून विविध व्यवसायाच्या संधी शोधून स्वतःचा उद्योग उभारता येतो.

तसेच त्यांनी ऑनलाइन शिक्षणाच्या संधींबाबत मार्गदर्शन करताना सांगितले की, 'स्वयम' व हे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असे रोडमॅप आहेत. शिक्षण घेण्याची जिद्द असलेल्या पण आर्थिक व सामाजिक अडचणींमुळे शिक्षण पूर्ण करता न आलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरण अंतर्गत या माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. या प्लॅटफॉर्मच्या सहाय्याने विद्यार्थी घरबसल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

याच कार्यक्रमात अंध-अपंग स्वाधार केंद्राचे संचालक श्री. हरिश्चंद्र सुडे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी अंध व्यक्तींनी तयार केलेल्या विविध हस्तकला वस्तूंची माहिती दिली. या वस्तू पूर्णपणे नैसर्गिक साधनसामग्रीपासून तयार केल्या जात असून त्यामध्ये आत्मनिर्भरतेचा संदेश दडलेला आहे, असे त्यांनी सांगितले तसेच, त्यांनी त्यांच्या केंद्रात दिल्या जाणाऱ्या विविध थेरपींची माहिती देताना सांगितले की, या थेरपींच्या माध्यमातून अनेक व्यक्तींना औषधोपचारांवर अवलंबून न राहता आपल्या आजारांवर मात करण्यास मदत होत आहे. समाजाने अशा उपक्रमांना पाठबळ देणे आवश्यक असून दिव्यांग व्यक्तींमध्ये असलेल्या कौशल्यांना योग्य व्यासपीठ मिळाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियांतर्गत होणार

# लातूर शहरातील कबाल्याचे वाटप

### नगरसेविका राजर्षी धोत्रे-बाहेती यांच्या मागणीस तहसिलदारांचा प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर पार पडत आहे. या अभियांतर्गत लातूर शहरातील प्रभाग क्र. १६सह विविध प्रभागातील नागरिकांचे कबाले वाटप करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका राजश्री धोत्रे बाहेती यांनी तहसीलदार यांच्याकडे केली होती. या मागणीस सकारात्मक प्रतिसाद देत ८ मे रोजी शहरांतर्गत घेतल्या जाणाया समाधान शिबिरात या कबाल्यांचे वाटप करण्यात येईल, असे पत्र तहसीलदार सौदागर तांदळे यांनी राजश्री धोत्रे-बाहेती यांना दिले आहे.

लातूर शहरातील विविध प्रभागातील नागरिक गेल्या अनेक वर्षापासून आपल्याला कबाले मिळावे, अशी मागणी करीत आहेत. याबाबतीत महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही निवेदन देण्यात आले आहे. सदर मागणी लक्षात घेवून नगरसेविका राजश्री धोत्रे-बाहेती यांनी प्रभाग १६ सह लातूर शहरातील विविध नागरिकांचे कबाले छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियांतर्गत वाटप करण्यात यावेत, अशी मागणी तहसीलदार तांदळे यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. त्याचसोबत नागरिकांचे महसुल विभागासंबंधी असणाया विविध अडचणी व रेंगाळलेली कामेही मार्गी लावावी असेही या पत्राच्या माध्यमातून मागणी करण्यात आली होती. नगरसेविका राजश्री धोत्रे-बाहेती यांच्या मागणीला सकारात्म प्रतिसाद देत तहसीलदार सौदागर तांदळे यांनी लातूर शहर महापालिका हद्दीत दि. ८ मे रोजी सदर अभियान आयोजित करण्यात आले असल्याचे सांगून या अभियानात नागरिकांना कबाले वाटपांसह विविध योजनांचा लाभ देण्यात येईल, असे पत्र दिलेले आहे.

अनाधिकृत बांधकामास दंड आकारून नियमित करण्याची मागणी

लातूर शहरात विविध ठिकाणी मनपा प्रशासनाने दिलेल्या बांधकाम परवान्यानुसार बांधकाम होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. या अनाधिकृत बांधकामांना मनपा प्रशासनाने दंड आकारून सदर बांधकामे नियमित करून घ्यावे, अशी मागणी नगरसेविका राजश्री धोत्रे -बाहेती यांनी मनपा आयुक्तांकडे केलेली आहे. सदर दंड आकारल्यास मनपाचे उत्पन्न वाढून अनधिकृत बांधकामांना आळा बसेल, असेही या पत्रात नमूद केले आहे. त्याचबरोबर मनपा प्रशासनाकडून बंद असलेली गुंठेवारीची प्रक्रियाही तात्काळ सुरु करावी, अशी मागणी केली आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# धाराशिव राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) शहर कार्याध्यक्षपदी नरसिंह मेटकरी यांची नियुक्ती



धाराशिव (प्रतिनिधी ): राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) यांच्या वतीने धाराशिव शहर कार्याध्यक्षपदी तरुण व तडफदार कार्यकर्ता नरसिंह लक्ष्मण मेटकरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाच्या मुंबई येथील राष्ट्रवादी भवन येथे अधिकृतरित्या जाहीर करण्यात आली.

या वेळी प्रदेशाध्यक्ष तथा माजी मंत्री शशिकांत शिंदे साहेब यांच्या हस्ते नरसिंह मेटकरी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास पक्षातील विविध वरिष्ठ पदाधिकारी व नगरसेवक उपस्थिती लाभली.या नियुक्तीबद्दल जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील, गटनेते खलिफाभाई कुरेशी, शहरप्रमुख, नगरसेवक आयाज भाई शेख यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभल्याचे मेटकरी यांनी नमूद केले. नवीन जबाबदारी स्वीकारताना नरसिंग मेटकरी म्हणाले, पक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास मी नक्कीच सार्थ ठरवेन. शहरातील संघटना अधिक बळकट करून प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्षविस्तारासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे.दरम्यान, मेटकरी यांच्या नियुक्तीमुळे धाराशिव शहरातील राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) संघटनेला नवी ऊर्जा मिळणार असून आगामी काळात पक्षविस्ताराला अधिक गती मिळेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांकडून व्यक्त केला जात आहे.

# सेवानिवृत्ती नव्हे तर सामाजिक सेवेचा प्रारंभ –बसवराज पाटील

मुरुम (प्रतिनिधी)– काकांनी ज्या उद्देशाने शैक्षणिक संस्था उभी केली. त्या हेतूनेच वरिष्ठ महाविद्यालयात चांगली माणसे नियुक्त केली. ती गुणात्मक, दर्जात्मक, चांगल्या विचारांची राहावीत, या भूमिकेतूनच चांगली माणसे निर्माण होणे, ही संस्थेची परंपरा राहिली असून ज्या कर्मचाऱ्यांनी संस्थेत राहून मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यामुळेच संस्थेचे शैक्षणिक क्षेत्रात नाव होत आहे. महाविद्यालयातील कर्मचारी हे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असले तरी ही त्यांची सेवानिवृत्ती नव्हे तर सामाजिक सेवेचा प्रारंभ असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री तथा भाजपचे लातूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष बसवराज पाटील यांनी केले. कार्यालयीन अधीक्षक राजू ढगे यांचा सोमवारी (ता. ३०) रोजी नगर शिक्षण विकास मंडळाच्या वतीने माधवराव पाटील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात




सेवापुर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी बसवराज पाटील व बापूराव पाटील यांच्या हस्ते राजू ढगे व मायाताई ढगे यांचा संपूर्ण आहेर उपचार करून सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री बसवराज पाटील होते. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, माजी प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, बीडचे कार्यकारी अभियंता शरीफ पटेल, धनराज मंगरूळे, मदन पाटील, देवेंद्र कंटेकुरे, प्राचार्य उल्हास घुरघुरे, इरफान मुजावर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी चैतन्यमूर्ति माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी बसवराज पाटील म्हणाले की, वैजनाथराव ढगे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या चिरंजीवाला उत्कृष्ट शिक्षण, संस्कार दिले. त्यांनी माधवराव (काका) पाटील परिवाराचे ऋणानुबंध कायम ठेवत प्रामाणिक, निष्ठा व कष्टाच्या जोरावर काम करत राहिले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन काकांनी त्या काळात राजू ढगे यांना शिक्षण संस्थेत काम करण्याची संधी दिली. त्यांनी देखील चांगले विचार जोपासून या परिसरात आपली ओळख निर्माण केली. आज ते सेवानिवृत्त होत असून, त्यांनी पुढील काळातही समाजासाठी चांगले कार्य करत रहावे.

सत्काराला उत्तर देताना ढगे म्हणाले की, या संस्थेने मला काम करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त करून सर्व उपस्थितांचे आभार मानले. प्रभारी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचलन डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी मानले. विविध शाळेतील सहशिक्षक, सहकारी मित्र, नातेवाईक, शहरातील पदाधिकारी-कार्यकर्ते आदींनी त्यांचा सत्कार केला.

फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात संस्थेच्या वतीने आयोजित राजू ढगे यांच्या सेवापुर्ती सोहळ्याच्या प्रसंगी बसवराज पाटील बोलताना बापूराव पाटील, व्यंकटराव जाधव व अन्य.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# सारोळा (बुद्रुक) येथील जिल्हा परिषद शाळेचा सांस्कृतिक महोत्सव उत्साहात संपन्न



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)– धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, सारोळा (बुद्रुक) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक महोत्सव २५ मार्च रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांचे चरित्र, महाराष्ट्राची कला परंपरा आणि भारताच्या सांस्कृतिक वारशावर आधारित विविध नाट्यकला, नृत्य आणि सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली.

या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असलेल्या कला, अभिनय आणि नृत्य कौशल्याला व्यासपीठ मिळाले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांना पालक आणि प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे, प्रेक्षक व पालकांकडून जवळपास ४० हजार रुपयांची बक्षिसे जाहीर करण्यात आली, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह अधिक वाढला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी वर्षभरात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. नवोदय स्कॉलरशिप, रायगडवीर, कब-बुलबुल यांसारख्या उपक्रमांमध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

सांस्कृतिक विभाग प्रमुख म्हणून विशाल सूर्यवंशी यांनी जबाबदारी सांभाळली. सूत्रसंचालन राजेंद्र अंगरके आणि सुमित्रा आटपलकर यांनी प्रभावीपणे केले. यावेळी श्रीमती गोकर्णताई कदम, प्रमोद पाटील, प्रशांत तात्या रणदिवे, निर्मलाताई चंदने, वैभव पाटील, नामदेव आप्पा खरे, बालाजी मसे, सचिन जासूद, आरटीओ कुदळे, दत्ता कुंभार, तानाजी वनकळस, संजय आबा पवार, राकेश कटारे, सुनिता वडगावकर, अनिता सूर्यवंशी, राजेंद्र सूर्यवंशी, शेषणी, नानासाहेब सावंत, बाळासाहेब कटारे, प्रवीण वाघमारे, उर्मिला देवगिरे आदी मान्यवर उपस्थित होते

# विवेकानंद जाधव यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



उमरगा (प्रतिनिधी)– येथील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरातील शिक्षक विवेकानंद गोविंदराव जाधव यांचा सेवापूर्ती समारंभ सोमवारी (३०) प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले.

सेवापूर्ती समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष मल्लिकार्जुनप्पा दंडगे होते. ज्येष्ठ संचालक डॉ. चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉ कपिल महाजन, रजनीकाकू महाजन, डॉ शुभांगी महाजन, सर्व संचालक, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, मुख्याध्यापिका सविता लोहार, संजय कोथळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संस्थेच्यावतीने पूर्ण आहेर देऊन जाधव पती-पत्नीचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वामी विवेकानंद विद्यामंदिर तर्फे अंगठी, पूर्ण आहेर देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात समीर देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सविता लोहार यांनी केले. जैतूनबी मेंडके यांनी आभार मानले.

# डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात मूट कोर्ट स्पर्धा



धाराशिव (प्रतिनिधी)– येथील डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयात मूट कोर्ट स्पर्धेचे यशस्वी आयोजन सोमवारी (दि. ३०) करण्यात आले. प्राचार्य डॉ. कायला कृष्ण मुर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. डॉ. संजय आंबेकर व सहसमन्वयक प्रा. कैलास शिकारे यांनी स्पर्धेचे नियोजन केले.

स्पर्धेचे उद्घाटन डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. व्ही. जी. शिंदे होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. अभय शहापूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर पारितोषिक वितरण समारंभाला अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्योती पाटील उपस्थित होत्या.

स्पर्धेत महाविद्यालयातील १६ संघांनी सहभाग नोंदवला. विविध अभिरूप न्यायालयांमध्ये झालेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत कु. सुशांत मिंधे, कु. मयुरी राजेनिंबाळकर व कु. प्रतीक्षा शिराळ यांच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर कु. ऋषिकेश जाधव, कु. गणेशसिंग किल्लेदार व कु. अभिषेक मोरे यांच्या संघाने उपविजेतेपद मिळवले. उत्कृष्ट युक्तिवादासाठी कु. ऋषिकेश जाधव याला प्रथम क्रमांकाचा सन्मान देण्यात आला.

स्पर्धेसाठी धाराशिव न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञांनी न्यायाधीश म्हणून कामकाज पाहिले. तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सार्थक सुरवसे व सुशांत मिंधे यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. दिलीप सलगर यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. प्रणिता भोसले यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्पर्धेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# मिशन लक्ष्यवेध : जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र सुरू

## ॲथलेटिक्स खेळातील २० खेळाडूंची निवड करण्यात येणार

धाराशिव (जिमाका)– राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी मिशन लक्ष्यवेध हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला असून,या योजनेअंतर्गत ॲथलेटिक्स या खेळासाठी अनिवासी जिल्हास्तरावर प्रतिभा विकास केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या जिल्हास्तर प्रतिभा विकास केंद्रांतर्गत ॲथलेटिक्स खेळातील २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.इच्छुक व पात्र खेळाडूंनी निर्धारित निकषांनुसार आपले अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे प्रत्यक्ष अथवा distsports.osmanabadgmail.com या ई-मेलवर ८ एप्रिल २०२६ पर्यंत सादर करावेत.

या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या खेळाडूंची वयोमर्यादा ३१ डिसेंबर २०२६ रोजी २१ वर्षांखालील असावी.अर्जासोबत जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र,आधार कार्ड, मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र,पासपोर्ट साईज तीन छायाचित्रे,शाळा/महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र तसेच पालकांचे संमतीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी खेळाडू असणे बंधनकारक असून,किमान राज्यस्तरावरील स्पर्धेत सहभाग किंवा पदकप्राप्ती (शालेय किंवा अधिकृत संघटना स्पर्धा) आवश्यक आहे.गत दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येईल. तसेच क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (फिटनेस) चाचणीत पात्र ठरणे अनिवार्य आहे.याशिवाय शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

निवड झालेल्या खेळाडूंना अनिवासी क्रीडा प्रशिक्षण,पायाभूत सुविधा, क्रीडा साहित्य,सराव व मूल्यमापनासाठी स्पर्धांचे आयोजन, स्पोर्ट्स सायन्स सेंटर,करिअर मार्गदर्शन तसेच देशी-विदेशी संस्थांच्या सहकार्याने क्षमता विकास कार्यक्रम अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.याशिवाय पूरक आहार खर्च, प्रशिक्षण साहित्य,देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागासाठी खर्च,तसेच वैद्यकीय उपचार व विमा सुविधा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत प्रदान करण्यात येणार आहेत.

मिशन लक्ष्यवेध योजनेअंतर्गत प्रवेशासाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी अर्ज करावा व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# धाराशिव पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव(प्रतिनिधी)– आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत अनिता रा. रामनगर सांजा ता. जि. धाराशिव या दि.३०.०३.२०२६ रोजी रामनगर सांजा येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर मिना खंडु रा. सेवालाल कॉलनी तेरणा कॉलेजच्या पाठीमागे धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.३०.०३.२०२६ रोजी अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

भुम पोलीस ठाणे अंतर्गत अशोक, सचिन दोघे रा.कन्हेरी ता. वाशी जि. धाराशिव हे दि.३०.०३.२०२६ रोजी अभिनंदन हॉटेल समोरील रोडवर भुम येथे अंदाजे २,३४० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १२ सिलबंद बाटल्या सह एकुण ३०,००० किंमतीची मोटरसायकल वर अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649